नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

या अंकांत

उपनिदर्थव्याख्या — डॉ. भाऊजी दफ्तरी

व

गडकरी स्मृतिदिनानिमित्त कवि प्रफुल्लदत्त
यांनी वाचलेला निबंध :
'सतारीचे नव्हे ! एकतारीचे बोल'

आणि

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचें
वि. सा. संमेलनाच्या उद्‌घाटनाचें भाषण.

याशिवाय संघवार्ता

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

संपादक :
दि. ब. पंडित

फेब्रुवारी १९५६
किंमत आठ आणे

श्री
विदर्भ साहित्य संघ
विदर्भ विषयः सारस्वतीजन्मभूः

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत १९२३
विदर्भ साहित्य संघ

वि. सा. संघाचें मुखपत्र

युगवाणी

संपादक :
श्री. दि. ब. पंडित

संपादक मंडळ :
डॉ. ना. के. महाजन
श्री. तु. ना. काटकर
श्री. म. अ. चान्सरकर
श्री. मा. नी. गलगलीकर
श्री. रा. ना. घाटोळे

वर्ष १० वें अंक ११ वा

फेब्रुवारी १९५६

संदर्भ ग्रंथालय
विदर्भ साहित्य संघ, नागपूर

संपादकीय

संपादकीय लिहून मी कंटाळलों आहें. दरवेळीं केवळ इतरांनी मला संपादकपदावर आरूढ केलें म्हणून त्या आढ्यतेच्या बळावर वाचकांसमोर शिष्टपणाच्या आविर्भावाने उपस्थित होणें कांही कठीण नाही. जीं कांही सोंगें आणतां येत नाहीत त्यांपैकीच एक शहाणपणाचें सोंग होय असें मला वाटतें. आपल्या शहाणपणाचा, ज्ञानाचा, वाङ्मयाच्या व्यासंगाचा, नवविचारांच्या परिचयाचा थोडक्यांत म्हणजे साहित्यिकपणाचा फुगा कधी फुटेल ह्या भीतीने मी कांही महिने वावरतों आहें. ह्या संपादकीय मजकूर लिहायच्या वेळीं तो नक्की फुटणार अशी माझी खात्री झाली म्हणून मी हा स्पष्टच खुलासा करीत आहें.

समाधान एवढेंच की मी माझी ही पात्रतेची यत्ता अगोदरपासूनच जाणून होतों व मी तसा खुलासा पहिल्याच अंकांत केलाहि होता. त्यामुळे आज माझ्यावर अगदीच फजितीची पाळी आलेली नाही. प्रामाणिकपणा हा सर्वश्रेष्ठ धूर्तपणा होय असें म्हणतात हें मला स्वानुभवावरून पटलें हाहि ह्या पदाचा लाभ थोडा नाही. माझ्या संपादकत्वाचा काळ थोडा उरला आहे. तेव्हा ह्या दोन महिन्यांत काम होईल तेवढें चांगल्या प्रकारें पार पाडावें असा संपादक मंडळाचा विचार आहे. वाचकांनी तें कार्य चांगलें मानून घ्यावें ही विनंती आहे.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

उपनिषदर्थव्याख्या : ९

क ठो प नि ष द्

डॉ. के. ल. उर्फ भाऊजी दफ्तरी

वल्ली ६ श्लोक ५--

यथादर्शे तथात्मनि यथा स्वप्ने तथा पितृलोके ।
यथाप्सुपरीवददृशे तथा गंधर्वलोके ।
छायातपयोरिव ब्रह्मलोके ।।५।।

अर्थ—शरीरांत असतांना [आत्मनि] म्हणजे जीवंतपणीं जें ज्ञान किंवा ब्रह्माचें प्रतिबिंब असतें तें आरशांतील प्रतिबिंबाप्रमाणें स्पष्ट पण उष्णतारहित असतें. शरीराबाहेर जाऊन म्हणजे मेल्यावर मनुष्य पितृलोकीं गेला तर तेथें ज्ञान किंवा ब्रह्माचें प्रतिबिंब स्वप्नांतील ज्ञानाप्रमाणें अंधुक असतें. मेल्यावर मनुष्य गंधर्वलोकीं गेला तर तेथें ज्ञान किंवा ब्रह्माचें प्रतिबिंब पाण्यावरील प्रतिबिंबाप्रमाणे, भोवती फिरणारें [परीव = परि इव] असें म्हणजे अस्थिर दिसतें [ददृशे]. ब्रह्मलोकीं मात्र म्हणजे मनुष्य मनानेच शरीराबाहेर जाऊन सर्वांच्या शरीरांत मीच आहे असें मानतो तेव्हा, ज्ञान किंवा ब्रह्माचें प्रतिबिंब, सूर्याचें सूर्यकांत मण्यांतून जें प्रतिबिंब [छाया] पडतें त्यासारखें उष्णतायुक्त म्हणजे आनंदी, स्पष्ट व स्थिर असतें. ॥५॥

टिप्पणें—मागील श्लोकांमध्ये मरणापूर्वीच ब्रह्माचें ज्ञान करून घेतलें पाहिजे असें सांगितलें आहे. ह्यावरून आणि पुढील श्लोक चवदांतील "अत्र ब्रह्म समश्नुते" ह्या वाक्यावरून या श्लोकांतील "ब्रह्मलोक" म्हणजे मरणापूर्वीची अवस्था होय असें स्पष्ट ठरतें. ह्या अवस्थेतील ब्रह्माच्या प्रतिबिंबाची तुलना करण्याकरिता ग्रंथकर्त्यानें श्लोकाच्या पूर्वीच्या पादामध्ये निर्दिष्ट केलेल्या आरशांतील किंवा पाण्यांतील प्रतिबिंबाहून भिन्न प्रकारचेंच प्रतिबिंब घेतलें असलें पाहिजे हें उघड आहे. अशा प्रकारचें प्रतिबिंब सूर्यकांत मण्यांतून (Convex lens) पडणारें प्रतिबिंब हेंच असूं शकतें. हें प्रतिबिंब सूर्यापेक्षा हि जास्त प्रभावी असतें, कारण प्रत्यक्ष सूर्य जाळूं शकत नाही, पण हें प्रतिबिंब कागद वगैरे वस्तू जाळूं शकतें. आरशांतील किंवा पाण्यांतील प्रतिबिंबहि जाळूं शकत नाही. ह्यावरून असें निश्चित दिसतें की "छायातप" ह्याचा अर्थ तप म्हणजे सूर्य व छाया म्हणजे सूर्याचें सूर्यकांत मण्यांतून पडणारें प्रतिबिंब. ह्या प्रतिबिंबाचे जे दाहक धर्म प्रसिद्ध आहेत, त्यांवरून ग्रंथकारास असें दाखवावयाचें आहे की सूर्यांत नसलेला दाहकधर्म जसा सूर्यकांत मण्यांतून पडणाऱ्या प्रतिबिंबांत असतो, तसा ब्रह्मांत नसलेला आनंद ब्रह्मज्ञ जीवांत असतो. सूर्यकांत-मणि फार प्राचीन काळापासून माहीत होता असें नल-राजाच्या हकीकतीवरून दिसतें, कारण त्याला केवळ मंत्रानें लाकूड पेटवितां येत असे अशी हकीकत आहे. श्री. शंकराचार्यांनी "छायातप" म्हणजे ऊन व सावली असा अर्थ करून ह्या श्लोकाचा अर्थ केला आहे. तो चूक आहे असें जरी म्हणतां येत नाही, तरी तो नीरस आहे हें खास. शिवाय त्याप्रमाणें, "यथादर्शे" आणि "छायातपयोरिव" ह्या दोहोंचाहि एकच म्हणजे विविक्त-पणा म्हणजे स्पष्टपणा हाच अर्थ आहे; परंतु ग्रंथकारास तर ह्या दोन ठिकाणीं दोन भिन्न अर्थ सांगावयाचे आहेत हें उघड आहे.

पितृलोक म्हणजे मेल्यानंतरची अवस्था; मेल्या-नंतर जे भूत म्हणजे पिशाच होतात म्हणजे जिवंत मनु-ष्यास पकडतात त्यांस गंधर्व म्हटलें आहे असें बृहदारण्यक ३।३।१ येथील "गंधर्वगृहीता" या शब्दावरून ठरतें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वल्ली ६ श्लोक ६

इंद्रियाणां पृथग्भावं उदयास्तमयौ च यत् ।
पृथदुत्पद्यमानानां मत्वा धीरो न शोचति ॥६॥

अर्थ—ज्या अर्थी [यत्] इंद्रियें आत्म्याहून भिन्न आहेत [पृथग्भावं] आणि आत्म्याहून भिन्न प्रकाराने उत्पन्न झालेल्या [पृथग् उत्पद्यमानानां] इंद्रियांनाच उत्पत्ति आणि नाश आहेत [उदयास्तमयौ] व आत्म्याला ते नाहीत हें जाणल्यामुळे [मत्वा] शहाणा मनुष्य [धीरः] शोक करीत नाही, त्याअर्थी सूर्यकांत मण्यांतून पडणाऱ्या सूर्याच्या प्रतिबिंबाप्रमाणे तो अत्यानंदयुक्त असतो [छायातपयोः इव ब्रह्मलोके] (मागील श्लोकांतील "छायातपयोरिव ब्रह्मलोके" ह्या सिद्धांताचें कारण ह्या श्लोकांत दिलें आहे हें ह्या श्लोकांतील "यत्" ह्या शब्दावरून स्पष्ट आहे.)

वल्ली ६ श्लोक ७-८

इंद्रियेभ्यः परंमनो मनसः सत्वमुत्तमम् ।
सत्वादधिमहानात्मा महतोऽव्यक्तमुत्तमम् ॥७॥
अव्यक्तात्तु परः पुरुषो व्यापकोऽलिंग एवच ।
यं ज्ञात्वा मुच्यते जंतुः अमृतत्वं च गच्छति ॥८॥

अर्थ—इंद्रियांच्या पलीकडे आंत [परम्] मन आहे. मनाच्या वर [उत्तमम्] म्हणजेच आंतमध्ये पलीकडे बुद्धि [सत्व] आहे. बुद्धीच्या वर [अधि] म्हणजेच आंतमध्ये पलीकडे महान् आत्मा म्हणजे जीवात्मा अथवा अहंकार आहे. महान् आत्म्याच्या वर [उत्तमम्] म्हणजेच पलीकडे आंतमध्ये अव्यक्त म्हणजे परमात्म्याला जीवात्म्याचें स्वरूप देणारें अज्ञेय कारण आहे आणि त्या अव्यक्ताच्या पलीकडे आंतमध्ये [परः] पुरुष म्हणजेच परमात्मा आहे. तो परमात्मा सर्वांना व्यापणारा परंतु लिंगरहित आहे. (लिंग म्हणजे जाणण्याचें इंद्रियगम्य चिन्ह जसें रूप, रस, गंध वगैरे). त्याला (बुद्धीने) जाणल्याने जीव (जंतुः) वासनांपासून मुक्त होतो आणि अत्यानंदाचा अनुभव घेतो [अमृतत्वं गच्छति] ॥ ८ ॥

टिप्पणी—इंद्रियाहून आत्मा भिन्न असें जें मागील श्लोकांत सांगितलें तें कसें तें या श्लोकांत वर्णिलें आहे. या श्लोकांशीं व वल्ली ३ श्लोक १०-११ ह्यांशीं विरोध आहे असें कोणीं म्हणतात पण तें चूक आहे. कारण येथे फक्त "इंद्रियें" व "मन" ह्यांमधील "अर्थ" ही पायरी गाळली आहे. इतर पायऱ्या तशाच कायम आहेत. एखादी पायरी गाळणें हा विरोध नव्हे.

वल्ली ६ श्लोक ९

न संदृशे तिष्ठति रूपमस्य ।
न चक्षुषा पश्यतिकश्चनैनम् ॥
हृदा मनीषा मनसाभिक्लृप्तो ।
य एतद्विदुरमृतास्ते भवंति ॥ ९ ॥

अर्थ—डोळ्याने पहावयाचे जे विषय आहेत त्यांपैकी [संदृशे] त्या ब्रह्माचें रूप नाही. म्हणून कोणीहि मनुष्य त्या ब्रह्माला डोळ्याने पाहूं शकत नाही. कोणत्याहि इंद्रियाने ब्रह्म जाणलें जाऊं शकत नाही हा भाव. अहंकाराने [हृदा] बुद्धीने [मनीषा] आणि मनाने त्याची कल्पना करावी लागते [अभिक्लृप्तः] म्हणजे जागृतींतच बुद्धि व मन ह्यांचा व्यापार चालूं असतांच तो जाणल्या जातो हा भाव आहे. त्याला जे जाणतात ते अमृत म्हणजे शाश्वत सुखाचा अनुभव घेणारे होतात. ॥ ९ ॥

वल्ली ६ श्लोक १०-१५

यदा पंचावतिष्ठंते ज्ञानानि मनसा सह ।
बुद्धिश्च न विचेष्टति तामाहुः परमां गतिम् ॥१०॥
तां योगमिति मन्यंते स्थिरामिंद्रियधारणाम् ।
अप्रमत्तस्तदा भवति योगोहि प्रभवाप्ययौ ॥११॥
नैव वाचा न मनसा प्राप्तुं शक्यो न चक्षुषा ।
अस्तीति ब्रुवतोन्यत्र कथं तदुपलभ्यते ॥१२॥
अस्तीत्येवोपलब्धव्यस्तत्वभावेन चोभयोः ।
अस्तीत्येवोपलब्धस्य तत्वभावः प्रसीदति ॥१४॥
यदा सर्वे प्रमुच्यंते कामायेस्य हृदि श्रिताः ।
अथ मर्त्योऽमृतो भवत्यत्र ब्रह्म समश्नुते ॥१४॥
यदा सर्वे प्रभिद्यंते हृदयस्येहग्रंथयः ।
अथ मर्त्योऽमृतो भवत्येतावदनुशासनम् ॥१५॥

अर्थ--जेव्हा पांचहि इंद्रियांकडून होणारीं ज्ञानें आणि मन हीं नाहीशी होतात [अवतिष्ठंते] आणि

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बुद्धि देखील आपला व्यापार करीत नाही, त्या स्थितीला परमगति असें कोणी म्हणतात. ॥१०॥ त्या स्थिर इंद्रियधारणेला म्हणजे प्रत्येक इंद्रिय स्थिर होतें अथवा काम करीत नाही त्या स्थितीलाच योग म्हणजे जीवब्रह्मैक्य ते मानतात; कारण त्यांच्या मतें, त्या योगानेच [तदा] मनुष्य अप्रमत्त होतो; कारण त्या योगानेच सुखाची उत्पत्ति [प्रभव] आणि दुःखाचा नाश होतो ॥११॥ (पण हें सर्व चूक आहे कारण त्या अवस्थेंत), वाणीने, डोळ्याने, किंवा मनानेहि तो परमात्मा जाणला जाऊं शकत नाही. परमात्मा आहे [अस्तीति] असें म्हणणाऱ्या मनुष्याशिवाय इतराला [ब्रुवतः अन्यत्र] म्हणजेच जागृतींतील बुद्धीच्या व्यापाराशिवाय तो कसा जाणला जाईल. ॥१२॥ परमात्मा आहे असें म्हणत असतांच [अस्तीत्येव] म्हणजे जागृतींतील बुद्धिव्यापार चालू असतांच परमात्मा जाणला जाऊं शकतो [उपलब्धव्यः]; कारण आत्मा व अनात्मा ह्या दोघांचेंहि स्वरूप [तत्त्वभावेन चोभयोः] तेव्हाच जाणलें जातें. आत्मा आहे असें बुद्धि ठरवितें तेव्हाच [अस्तीत्येवोपलब्धस्य] आत्म्याचें स्वरूप [तत्वभावः] स्पष्टपणें समजतें [प्रसीदति] ॥१३॥ (हा योग परमगति नव्हे तर श्रेष्ठगति कोणती असें विचाराल तर सांगतों ऐका.) म्हणून हा योग श्रेष्ठगति नव्हे. जेव्हा हृदयांत असलेले सर्व काम टाकून दिले जातात, तेव्हाच मर्त्य म्हणजे दुःखी असलेला मनुष्य सुखी [अमृत] होतो आणि मरणापूर्वीच [अत्र] ब्रह्माचा उपभोग घेतो. ॥१४॥ जेव्हा हृदयांत असलेल्या वासनाग्रंथींचा भेद होतो, तेव्हाच मर्त्य म्हणजे दुःखी असलेला मनुष्य सुखी होतो. एवढेंच [एतावद्] वेदांमध्ये सांगितलें आहे. [अनुशासनम्.] ॥१५॥

टिप्पणें--जागृतींत बुद्धि व मन ह्यांचा व्यापार चालू असतांनाच तो परमात्मा (ब्रह्म) जाणला जातो असें नवव्या श्लोकांत सांगितलें. त्यावरील आक्षेपकांचें म्हणणें श्लोक १० व ११ ह्यांत सांगून त्या आक्षेपाचें खंडन श्लोक १२ ते १५ ह्यांत केले आहे, असा आमचा अर्थ आहे व तसा अर्थ आजपर्यंत कोणीच केला नाही. म्हणून आम्ही असा अर्थ कां केला ह्याचें कारण सांगणें जरूर आहे. "हृदा मनीषा मनसाभिक्लृप्तः" आणि "नैव वाचा न मनसा प्राप्तुं शक्यो न चक्षुषा" हीं वाक्यें परस्पर विरुद्ध आहेत. म्हणून हें दुसरें वाक्य योगस्थितीसंबंधी आहे असें मानणें भाग आहे. म्हणजे त्याचा अर्थ "योगस्थितींत आत्मा वाणीने, डोळ्याने किंवा मनाने हि जाणल्या जाऊं शकत नाही; कारण त्यांचे व्यापारच तेव्हा बंद असतात" असा करावा लागतो. असा त्याचा अर्थ केल्यावर आत्मा केव्हा जाणला जाऊं शकतो हें सांगणारें वाक्य पुढे आहे असें मानावेंच लागतें आणि तोच अर्थ पुढील वाक्यांतून काढावा लागतो. हेंच आम्ही केलें आहे. श्री शंकराचार्यांनी श्लोक १०-११ ह्यांचा अर्थ बहुतेक आमच्या अर्थासारखाच केला आहे. पण श्लोक १२-१३ मध्ये "योग निरर्थक आहे" ह्या आक्षेपाचे (योगोऽनर्थकः) खंडन आहे, असा अर्थ त्यांनी काढण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या अर्थाचेंहि सार असें आहे की "ब्रह्म आहे" असें आगमानुसार म्हणणाऱ्या आस्तिकाशिवाय इतरांस ब्रह्माचें ज्ञान होणार नाही. ह्या उत्तराने देखील योगाचें आनर्थक्यच सिद्ध होतें आणि विचाराचें किंवा आगमाचें उपयोगित्व सिद्ध होतें. आमच्या अर्थाप्रमाणे योग ह्या अवस्थेचेंच खंडन श्लोक १२-१३ मध्ये आहे व तें नवव्या श्लोकाशीं अनुरूप असेंच आहे. श्लोक ९ मध्ये बुद्धीनें आत्मा जाणल्या जातो असें म्हटलें आहे त्याशीं श्लोक १०-११ विरुद्ध असल्यामुळे त्या श्लोक १०-११ मध्ये पूर्वपक्षाचें म्हणणें असलें पाहिजे. आणि त्याला उत्तर पुढील श्लोकांत असलें पाहिजे. श्लोक ९ मध्ये वर्णिलेल्या सम्यक् दर्शनाचा उपाय म्हणून योग श्लोक १०-११ मध्ये सांगितला असेंहि श्री शंकराचार्य म्हणतात ("साद्दन्मनीद् कथं प्राप्यते तदर्थो योग उच्यते") तेंहि बरोबर नाही. कारण तेथें योगाला उपाय म्हटलें नसून परमगति म्हटलें आहे. "मनसाऽभिक्लृप्तः" आणि "न मनसा प्राप्तुं शक्यः" ह्या परस्परविरुद्ध वाक्यांची संगति श्री. शंकराचार्यांनी लाविली नाही.

वल्ली ६ श्लोक १६

शतं चैका हृदयस्य नाड्यः।
तासां मूर्धानमभिनिःसृतैका ॥
तयोर्ध्वमायन्नमृतत्वमेति ।
विष्वङ्ङन्या उत्क्रमणे भवंति ॥१६॥

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अर्थ--हृदयापासून एकशे एक नाडी निघाल्या आहेत. त्यांपैकी एक डोक्याकडे गेलेली आहे. तिने वर गेलें तर मनुष्य अत्यानंदाला प्राप्त होतो. (अमृतत्वमेति) परंतु दुसऱ्या नाडीखाली चोंहीकडे म्हणजे विषयांकडे (विष्वङ्) जाण्याकरिता (उत्क्रमणे) आहेत. ॥१६॥

टिप्पणें—हृदयापासून खाली आणि वर म्हणजे वल्ली ४ श्लोक १-२ ह्यांतील वर्णनाप्रमाणे बाहेर व आंत जाण्याचे मार्ग आहेत हें उघड आहे. त्यांसच येथे नाडी म्हटलें आहे. वरच्या नाडीने जाणारा म्हणजे आत्म्याच्या स्वरूपाचें चिंतन करणारा अत्यानंदाला प्राप्त होतो. परंतु खालच्या चोहीकडच्या नाडींनी जाणारा म्हणजे इंद्रियोपभोगांकडे जाणारा मनुष्य मृत्यूला म्हणजेच दुःखाला प्राप्त होतो. एकूण वल्ली ४ श्लोक १-२ मध्ये जो अर्थ सांगितला आहे तोच येथेहि सांगितला आहे. मरणानंतरच्या निरनिराळया भिन्न गति ह्यांत वर्णिल्या आहेत, असें मानण्याची गरज नाही. त्या अर्थापेक्षा आमचा हा अर्थ फारच सरस आहे.

वल्ली ६ श्लोक १७

अंगुष्ठमात्रः पुरुषोंतरात्मा ।
सदाजनानां हृदये संनिविष्टः ॥
तं स्वाच्छरीरात् प्रबृहेन् ।
मुंजादिवेषिकां धैर्यण ॥
तंविद्याच्छुक्रममृतम् ।
तंविद्याच्छुक्रममृतम् ॥१७॥

अर्थ—अंतरात्मा पुरुष म्हणजे ब्रह्मच अंगुष्ठमात्र म्हणजे जीवात्मा होऊन सदा सर्व जनांच्या हृदयांत प्रवेश करून राहिला आहे. गवतांतून त्याच्या आंतील काडी जशी बाहेर काढतात तसा धैर्याने तो जीवात्मा आपल्या शरीरांतून बाहेर काढावा तसाच तो सर्वांच्या शरीरांतून निघेल, म्हणून मीच सर्वांच्या शरीरांमध्ये आहे असें मानावें. असें मानणाराच [तं] शुद्ध [शुक्र] म्हणजे वासनारहित आणि अत्यानंदी [अमृतं] असतो असें जाणावें. असें मानणाराच शुद्ध व अत्यानंदी असतो असें जाणावें. ॥१७॥ सर्व उपनिषदांचें सार ह्या श्लोकांत सांगितलें आहे.

वल्ली ६ श्लोक १८

मृत्युप्रोक्तां नचिकेतोथ लब्ध्वा ।
विद्यामेतां योगविधिं च कृत्स्नम् ॥
ब्रह्मप्राप्तो विरजोऽभूद्विमृत्युः ।
अन्योप्येवं यो विद्ध्यात्ममेवम् ॥१८॥

अर्थ—ह्याप्रमाणे मृत्यूने सांगितलेली विद्या आणि संपूर्ण योगविधि ऐकून नचिकेताला ब्रह्माची प्राप्ति झाली आणि तो वासनारहित [विरज] आणि दुःखरहित [विमृत्यु] झाला, त्याप्रमाणेच दुसराहि कोणी जो शरीरांतील जीवाविषयी [अध्यात्मम्] हें ज्ञान जाणेल [विद्] तो देखील त्याप्रमाणेच होईल.

टिप्पणें—हा श्लोक प्रक्षिप्त आहे की काय ह्या विषयी विचार आरंभींच केला आहे. या श्लोकांतील शेवटचा शब्द " एव" असाहि कांही प्रतींत आहे आणि "एवं" असाहि कांही प्रतींत आहे. आम्हांस "एवं" हाच पाठ ग्राह्य वाटतो.

मराठवाड्यांतील एकमेव मराठी मासिक
मराठवाडा साहित्य परिषदेचें मुखपत्र

प्रतिष्ठान

दर महिन्याच्या १ तारखेस प्रसिद्ध होतें
समीक्षा, ललित, काव्य, संशोधन इत्यादि विषयांवरील मौलिक साहित्य

आजच वर्गणीदार व्हा

वार्षिक वर्गणी रु. ५ किरकोळ अंक ८ आ.
जाहिराती स्वीकारल्या जातात
मराठवाड्याबाहेर एजन्सी देणें आहे. लिहा.

"प्रतिष्ठान" कार्यालय,
इसामिया बाजार,
हैदराबाद-दक्षिण.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गोविंदाग्रजांची कविता

मतारीचे, नव्हे ! एकतारीचे बोल

(विदर्भ साहित्य संघ गडकरी-स्मारक समितीच्या विद्यमानें
गडकरी-स्मृतिदिनानिमित्त दि. २४ जानेवारी १९५६ रोजीं झालेलें
द. वि. तेंडुलकर ह्यांचें भाषण)

रसिक श्रोतेहो !

रसवंतीच्या तालावर रसिकांना नाचविणाऱ्या भाषा-प्रभूवरील प्रेमामुळे आपण सारे येथें आलां आहांत. आणि विदर्भ साहित्य संघाच्या वतीने गडकरी स्मारक समितीने त्यांच्या कवितेवरील प्रबंध वाचण्यासाठी मला येथें बोलाविलें आहे. ही संधि दिल्याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहें. ह्यांत माझ्या योग्यतेपेक्षा योगायोगाचाच भाग अधिक आहे, याची मला जाणीव आहे. नाहीतर वाङ्मय-क्षेत्रांत कोणतीहि डोळ्यांत भरणारी मुलुखगिरी न केलेल्या माझ्यासारख्या सामान्य रसिकाला आपण इथे येण्याचें आमंत्रण दिलें नसतेंत. समितीचे कार्यवाह श्री गडकरी ह्यांची व माझी मुंबईत भेट झाली म्हणून हा योग जुळून आला. ह्या व्यासपीठावरून आजवर अनेक नामवंत साहित्यिकांचीं आणि वक्त्यांचीं भाषणें झालीं असतील. त्यांतील कांहीजण माझ्यासमोरील श्रोत्यांत असण्याचा संभव आहे. त्यांच्या पंक्तींत समितीने आज मलाहि बसविल्यामुळे मी संकोचून गेलों आहें. त्या संकोचांत माझा आजवरची साहित्य-सेवा शारदेच्या चरणीं रुजूं झाल्याचें जसें समाधान आहे, तसाच 'आपण माझ्यावर टाकलेल्या जबाबदारीचा भार पेलतां कसा येईल ?' हा विचार आहे.

गोविंदाग्रजांच्या कवितेवर आजवर खूप लिहिलें गेलें, बोलले गेलें. त्याहून अधिक आणि वेगळें असें मी काय बोलणार ? मंदिरांत एकाच देवाची अनेकजण पूजा करतात. प्रत्येकाचें स्तोत्र निराळें. त्या स्तोत्रांतील स्वरसंगति निराळी. कुणी जगाची दृष्टि वेधून घेण्यासाठी पूजा करतो, तर कुणाची, 'ब्रह्मानंदीं लागली टाळी-मग देहातें कोण सांभाळी ?' अशी समाधि लागते. कुणी सलगीने देव्हाऱ्याजवळील नंदादीपाशीं उभा राहतो, तर कुणी संकोचाने कोपऱ्यांतील कोनाड्यांत तेवत राहणाऱ्या पणतीच्या प्रकाशांत ध्यानस्थ बसतो. 'राम'मंदिरांत आज इतकीं वर्षें असें गुण-संकीर्तन चाललें आहे. त्यांत निष्ठावंतांची गर्दी झालेली आहे, हें जसें पहातों, तसें प्रतिष्ठा मिळवूं पाहाणाऱ्यांनी गर्दी केली आहे, हेंहि माझ्या लक्षांत आलें आहे. मी आपला उंबरठ्यावरूनच माझ्या रामावर हीं फुलें उधळणार आहे. माझ्या ओंजळींतील फुलांस,

'रंगरूप या असो नसो वा
ज्यांत खरा भक्तीचा ठेवा
रुचतें सारे तें तें देवा,

ह्या भावनेने आणि एका विशिष्ट आंतरिक समाधानाने मी ही पूजेची सिद्धता करून उभा आहे.

आज तीन तपांनंतरहि गोविंदाग्रजांची कविता आवडीने वाचली जात आहे, यांतच तिच्या लोकप्रियतेचें बीज आहे, तिच्या भाव-सौंदर्याची साक्ष आहे. यांत कुणाला त्यांच्या अनुयायांनी आपल्या दैवतासमोर अंधश्रद्धेने जाळलेल्या धूपाचा वास येईल. "घराघरांत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पणतीच्या प्रकाशांत व्यक्तीने ज्याचें पूजन करावें त्याची विजलीच्या तेजांत ही महापूजा कशाला ?" असेंहि कुणी म्हणेल. पण ज्यांनी

"प्रतिभालापें खुडित ख-पुष्पें
जागविलें अवघ्या जगा,"

आणि ज्यांच्या वाग्वैजयंतींतील सौगंधाने सामान्यांचीं देखील महिरलेलीं मनें मोहरून गेलीं, ती काय त्यांच्या कवितेंत किमया असल्याशिवाय ?

त्यांच्याच शब्दांत सांगावयाचें म्हणजे वाग्वैजयंतींत, नानास्थळीं मनांत भरलेल्या भावनांची स्वच्छंद गुंफण आहे. मनांत संचारलेल्या अनिर्बंध भावनांचा समुच्चय आहे, सुखाहून दुःख रुचणाऱ्या वेडया जीवाचे बोल आहेत, स्वानुभवाने डोलणाऱ्या, ठराविकाला लाथ मारणाऱ्या, नभाला उल्लंघू पाहणाऱ्या मुक्या मनाच्या उघडया ताना आहेत, काळोखाच्या लाटांवर तरंगणारे तेजाचे तुषार आहेत, प्रेमाची दृष्ट काढण्यासाठी अतिहृष्ट झालेल्या गरीव रसवंतीने उवळलेलीं शब्द-मौक्तिकें आहेत, प्रेमांतून शोकच मागे राहिलेल्या जड जिवाचा पदन्यास आहे,

"सूर जमेना, चित्त रमेना,
मज करमेना,
विरमेना रव भंवतीचा"

अशा अर्थाची विलापिका आहे, मरणाचें सुख सापडलेल्या आणि म्हणून स्वतःच्याच प्रेतावर बसलेल्या जिवाचें जगणें आहे, परमेश्वरालाहि मुठींत आणू शकणाऱ्या प्रेमाचा दावा आहे, नशिबांत दुःख लिहिलेल्या हताश हृदयाने शांतीसाठी परमेश्वराजवळ आसवांच्या अभिषेकासाठी केलेली विनंती आहे. ओठांशीं भिडणारें परंतु कुणालाहि न सांगता येण्याजोगें रहस्य आहे, चिरनिराश जिवाची पुन्हा उमलावयाची मनीषा आहे, इष्काचा जहरी प्याला हातीं आलेल्या जगन्नाथाच्या गंगालहरी आहेत, जन्माचें चीज झालेल्या, विश्वाचें बीज गवसलेल्या, कायमची नीज मेलेल्या चिद्वृत्तीचा विलास आहे, अरुण-रसाने रंगविलेल्या प्रेमचित्रांतून ध्वनित झालेला हृदयाचा शिलालेख आहे, प्रीति-देवता नाही म्हणून भग्न झालेल्या हृदयमंदिराचे अवशेष आहेत, कुसंगतीहून एकांत बऱ्या मानणाऱ्या मनाचे निःश्वास आहेत, प्रेमाची होळी झालेल्या आणि तें दुःख विसरण्यासाठी वैराग्याची झोळी घेतलेल्या निरंजनाची निष्ठा आहे, जीवाच्या बागेंत स्वतःच्याच पंखांतील पिसें उकलणाऱ्या पक्षाच्या मनाची विफलता आहे, जन्मापासूनच निराश असलेल्या दिव्य प्रेमाच्या जातीची ओळख आहे, कृष्णाकाठीं इष्काचे प्याले पिणाऱ्या दोन दग्ध जीवांची करुण कहाणी आहे आणि जन्मभर चाललेल्या प्रेमयज्ञांत दिलेली अखेरची आहुति आहे.

ह्या सर्व कवितांत 'तेंच तें' आहे हें जरी खरें तरी त्यांत 'आपले'पण आहे हेंहि नाकबूल करतां येणार नाही. गोविंदाग्रजांची एखादीच कविता वाचून त्यावरून तिची चिरंतनता ठरवायची म्हटलें तर कदाचित त्यांच्या समकालीन कवींच्या कांही कविता त्यांच्या कवितेपेक्षा सरस अगर सकस ठरतील, पण एकसमयावच्छेदेंकरून होणारा त्यांच्या कवितेचा परिणाम इतरांपेक्षा कितो तरी पटीनें अधिक आहे.

गोविंदाग्रजांनी केशवसुतांना गुरु मानलें आहे, हें ठिकठिकाणीं त्यांनी त्यांच्याबद्दल केलेल्या उल्लेखांवरून स्पष्ट होतें.

पहा—एकेका शब्दें भरले काव्याचे अद्भुत पेले !
ज्यांसाठी मानव झटले, ते सुधाकुंभ भरलेले...
वाग्देवी वरुनी टाकी केशवसुत हृदयीं झेले !'
ते 'अनुभवुनि निजानंदाने
मग त्यांचें केलें गाणें,'
'केशवपुत्राचा महशूर गोविंदाग्रज चेला सच्चा'
'शिवरायाच्या मागे आम्ही लाल महालीं फिरणें
तसेंच तुमच्यामागे आम्ही नवीन कविता करणें'
'कवि कृष्णाच्या निर्यमका हे महाराष्ट्र-देशा !'
'घ्या कृष्णाची करी तुतारी'

हे उतारे वाचले म्हणजे गोविंदाग्रजांनी केशवसुतांना गुरुस्थानीं कोणत्या हेतूने मानलें हें समजत नाही. कारण दोघांच्या कलाकृतीचा घाट अंतर्बाह्य वेगळा आहे. केशवसुतांची कविता वैचारिक आहे, तर गोविंदाग्रजांची कविता भावनात्मक आहे. एकाची

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भाषा रांगडी आहे, तर दुसऱ्याची रंगविलेली आहे. एकाच्या वाणींत आवेश आहे, तर दुसऱ्याच्या वाणींत आवर्तन आहे. एकाचें मन सामाजिक कोडयांची उकल करण्यांत गुंतलें होतें तर दुसऱ्याचें मन वैयक्तिक भावनांची गुंतागुंत उकलण्यांत रमलें होतें. पण कुणी कुणाला गुरु मानावें हा भावनेचा प्रश्न आहे. मानणे हा मनाचा धर्म आहे. आपल्या आधी नांवालौकिकास पात्र ठरलेल्यांचा गौरव करणें हें सद्भावनेचें लक्षण आहे. पण जितक्या उत्कटतेने त्यांनी आपल्या गुरूंचा उल्लेख केला आहे, तितकें त्यांचें अनुकरण त्यांच्या कवितांत झालेलें नाही. कांही ठिकाणीं अंधानुकरणाने केलेले प्रयत्न दिसून येतात आणि नेमका त्याच ठिकाणीं त्यांच्या प्रतिभेचा पद-न्यास बेगडी वाटतो. साहजिकच आहे, अनुभूतीच्या अभावीं त्यांत भावनांचा नृत्य-विलास कसा दिसावा ?

उदाहरणादाखल आपण त्यांची 'दसरा' ही कविता घेऊं. केशवसुतांच्या 'तुतारी'ची ही री ओढलेली आहे. 'तुतारीं'तील तडफ 'दसऱ्यां'त नाही. पिंडांत नाही तें ब्रह्माण्डांत नाहीच दिसणार.

'जुनें जाउं द्या मरणालागुनि
जाळुनि किंवा पुरुनी टाका
सडत न एक्या ठायीं एका ' (के.)

' जुन्या ऋषींना सलाम ठोकुनि
करा तयारी छाती ठोकुनि,
आज-कालच्या ऋषींमागुनी—(गो.)

'घुबडास' 'स्मशानांतलें गाणें' 'कलगीचें गाणें' 'अवेळीं ओरडणाऱ्या कोकिळेस' 'फुटकी तपेली' वगैरे कवितांतून केशवसुतांची छाया पडल्यासारखी वाटते. पण ती तेवढयापुरतीच. त्यांच्या कवितेचा तो 'संचारी' भाव म्हणतां येईल, 'स्यायी' भाव नव्हे. विषण्णता प्रामुख्याने सामाजिक विषमतेंतून निर्माण झालेली असल्यामुळे ती 'झपूर्झा'मधील

' ज्ञाताच्या कुंपणावरून
धीरत्व धरून
उड्डाण करून'

जाणाऱ्या चिद्घन-चपलेप्रमाणें भासते. नवें विश्व निर्माण करण्याच्या भावनेने आकाशाच्या कोनांत समाधिस्थ झालेली केशवसुतांची प्रतिभा दिशांच्या कोनाकोपऱ्यास उजळू शकत होती.

' काळोखाच्या जगामधे या
मृत आशांच्या चितांवरुनि या
पिशाच्च माझें भटकत आहे, शांति नसेचि तया'

आणि 'हातीं संसाराची माती
मनिंच्या आशा मनास खाती
भूतकालचीं भूतें रडतीं !
मिटल्या जाग्या डोळचांपुढती शून्याचें मैदान ! ' (गो.)

दोघांच्या ह्या दोन कडव्यांमधून प्रतीत होणारी भावनांची भूमि एक नव्हती. मग असें म्हणावें लागेल की गोविंदाग्रजांनी केशवसुतांचें शिष्यत्व वाणीनें पत्करिलें होतें, विचारसरणीने नव्हे. त्यांच्या बहुतेक कविता स्वयंभू आहेत, स्वतंत्र आहेत. कलेच्या प्रांतात एकाचें दुसऱ्यानें जाणिवेनें अनुकरण केलें की दुसरा दुय्यम ठरतो. गोविंदाग्रजांनी तसें कुणाचेंच अनुकरण केलेलें नाही.

× × ×

श्री माडखोलकर लिहितात, "गोविंदाग्रज हे कलोपासक होते, केशवसुतांप्रमाणे निसर्गोपासक नव्हे. कल्पकता, तज्जन्य अतिरंजन आणि तद्भूत कृत्रिमता हे त्यांच्या कवितेचे विशेष म्हणून सांगतां येतील. त्यांच्या कवितेला जशी उज्ज्वलता तशीच अस्वाभाविकताहि आलेली आहे. त्यांच्या मनाला वास्तवापेक्षा अद्भुताचें आणि औचित्यापेक्षा वैचित्र्याचें आकर्षण अधिक होतें. कल्पनासृष्टींतल्या प्रियेच्या विरहानें झुरून नकली वैणिकें लिहिण्याचा केशवसुतांनी सुरू केलेला स्त्रैण संप्रदाय गोविंदाग्रजांनी आपल्या कल्पनारम्य प्रेमगीतांमुळे अतिरेकाला नेला. त्यांच्या प्रेमकवितेंत बुद्धिविलास असला, तरी हार्द फारसें नाहीं." (अर्वाचीन मराठी साहित्य)

वरील उताऱ्यांतील कांही विधानें मला मान्य आहेत, पण पुढील विधानाबद्दल माझा मतभेद आहे, उदा:— "कल्पनासृष्टींतल्या प्रियेच्या विरहानें झुरून नकली वैणिकें लिहिण्याचा केशवसुतांनी सुरू केलेला स्त्रैण

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संप्रदाय गोविंदाग्रजांनी आपल्या कल्पनारम्य प्रेमगीतांमुळे अतिरेकाला नेला." हें विधान ध्या गोविंदाग्रजांचीं प्रेमगीतें श्री माडखोलकरांना नकलीं वाटतात कारण तीं काल्पनिक होतीं असा त्यांचा समज होता. आज आहे किंवा नाही, हें मला माहित नाहीं. गोविंदाग्रजांप्रमाणे केशवसुतांवरहि ते असाच आरोप करतात. मला केशवसुताच्या प्रेमगीतांबद्दल तसें कांही सांगतां येणार नाही. पण गोविंदाग्रजांचीं प्रेमगीतें खऱ्याखुऱ्या प्रणायिनीच्या विरहानें स्फुरलीं होतीं; हें मी सांगूं शकेन.

'मुकलें तरीहि सुवास राखी; दृढतेचा भाव;
प्रेमपुष्प बकुलाचें वसवी प्रेमाचा गाव !'

दुसरा प्रश्न असा की, 'स्त्रैण संप्रदाय' हे शब्द वापरण्यांत कोणता अर्थ आहे ? गीतें स्त्रीवर असोत किंवा दुसऱ्या कुणावर असोत, कविता म्हणून त्यांचें रस-ग्रहण करतांना ह्याचा उल्लेख कशाला ? आज शेकडों वर्षे कल्पना-रम्य कमळांनी युक्त अशा शृंगार-रसाच्या पुष्करिणींत जगांतील साहित्य स्नान करीत असतांना गोविंदाग्रजांच्या प्रेमगीतांना स्त्रैण म्हणण्याचा हेतु काय ? कृत्रिमता हा दोष कदाचित् मान्य होण्यासारखा आहे. उत्प्रेक्षा-विलासाच्या भरांत कांही कल्पना कृत्रिम वाटाव्यात आणि वाटतात हें खरें आहे. 'गोविंदाग्रजांच्या कवितेंत बुद्धि-विलास असला तरी फारसें हार्द नाही' असेंहि ते म्हणतात. 'हार्द' हा शब्द 'हृदय' ह्या शब्दापासून आलेला आहे. हृदयांतील आशेच्या जळलेल्या मोहोरांतून तर त्यांची कविता उद्भवलेली आहे. त्यांच्या भावदग्ध मनाला असह्य झालेल्या एकांतांतील घटका त्यांच्या कवितेंत शब्दबद्ध झालेल्या आहेत.

'जगावाचुनी लाभतीस तरि जग मीं केलें असतें
तुझ्यावाचुनी जग हें आता असून झालें नसतें'

ह्या चरणांवरून त्यांच्या दग्ध मनाची कल्पना येईल. कृत्रिमता ही त्यांच्या शब्दांच्या वेडांतून आलेली आहे. आणि चिंतनशील प्रवृत्तीच्या लेखकाच्या लिखाणांत हा दोष (मानला तर) येणें अपरिहार्य आहे. गोविंदाग्रजांच्या मागाहून त्यांच्याप्रमाणे भाषा लिहिणारे कुसुमाग्रज यांच्या लिखाणांतून अशीच शब्दशैली आढळून येते. 'त्यांची कविता अतिरंजित,' आहे ह्या आरोपावर मी एवढेंच म्हणूं शकेन कीं अतिदुःखित मनाला सुखाभासावर जगावें लागतें.

श्री माडखोलकरांप्रमाणे प्रा. हर्षे, डॉ. वाळिंबे, आचार्य अत्रे, श्री खांडेकर, प्रा. माटे, रे. टिळक इत्यादींनी गोविंदाग्रजांच्या कवितेवर लिहिलेलें आहे. प्रा. हर्षे ह्यांना गोविंदाग्रजांचीं प्रेमकाव्यें वैषयिक वाटतात. 'मार भरारी चल तोड बन्धनें सारीं' ह्या गीतांतून त्यांनी, "वैवाहिक बंधनें झुगारून देण्याचा विचार गडकऱ्यांच्या मनांत आलेला होता," असा निष्कर्ष काढला आहे. डॉ. वाळिंबे म्हणतात, "तरुणीच्या प्रेमाच्या प्राप्तीसाठी गडकऱ्यांचें मन किती विलक्षण आसावलें व त्या संवेदनेमुळे उत्पन्न होणाऱ्या स्पंदनांतील थरारणारी उत्सुकता अनुभवावयास सापडावी यासाठी ते किती तळमळत याचें प्रत्यंतर 'हलत्या पिंपळपानांत' मिळेल." तसें म्हटलें तर कल्पनेवर जगणाऱ्या गोविंदाग्रजांच्या कित्येक कवितांत इष्काचा जांभुळी रंग दिसतो. श्री खांडेकर म्हणतात, गडकऱ्यांच्या कवितेंत कल्पनाविलासाच्या मानानें रसोत्कटता कमी आहे. रे. टिळक 'राजहंस माझा निजला' ह्या कवितेवद्दल आक्षेप घेतांना लिहितात, "पुत्रमरणाच्या दुःखानें वेडी झालेली आई 'या माझ्या मानससरसीं' सारखी संस्कृतप्रचुर आणि रूपकात्मक भाषा वापरील काय ?" प्रा. माटे आपल्या "गडकरी यांची प्रमत्त प्रतिभा' या लेखांत लिहितात, 'शेकडो लेखकांना आपल्या प्रतिभेचा क्षुद्र रिठा फेसाळावा लागतो व त्याच्या क्षणजीवी फेसाच्या वैभवांत आनंद मानावा लागतो. त्यांचें मूळचें भांडवल अगदी बेताचें असतें. गोविंदाग्रजांची प्रतिभा त्यांच्या मनःकोषांतून अशी वेगानें आणि मुबलगपणें उसळत बाहेर पडते. त्यांच्या प्रतिभेचें उत्तुंग वैभव पाहून मन स्तिमित होऊन जातें. एखादा मोर जसा आपल्या सहस्र डोळयांचा पिसारा उभारून मोठ्या डौलानें उपवनांत ठुमकतो तसें गडकरी हे आपली उफाड्याची प्रतिभा जागृत करून वाङ्मयांत वावरूं लागलें म्हणजे वाचकांचें काय किंवा प्रेक्षकांचें काय भान सुटून जातें

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आणि त्या सृष्टि–दत्त वैभवाकडे डोळे दिपत दिपतच पण रोखाने पाहत राहण्याची हौस त्याला वाटते. गडकऱ्यांच्या कवितेबद्दल महाराष्ट्रांत आजवर जास्तींत जास्त कुणीं लिहिलें असेल तर ते आचार्य अत्रे ह्यांनी होय. त्यांच्या पुढील उताऱ्यांवरून गोविंदाग्रजांबद्दल त्यांना वाटणारें प्रेम दिसून येतें.

" मानवी जीवनांतलीं जीं चिरंतन मूल्यें होतीं, त्यांच्यावर आपल्या प्रतिभेची पूजा बांधण्यांत ते सदैव गुंग असत. कौटुंबिक जीवनांतील जीं भावनात्मक बंधनें आहेत, त्यांतील जिव्हाळा आणि भावना यांची अत्यंत भक्तिभावाने जपणूक करावयास ते जागरूक असत. "

–-" प्रतिभेच्या पंखावर बसून ते विचाराच्या आकाशांत एकसारखा भराऱ्या मारीत असत. शरीराच्या जगांत ते फार थोडा वेळ जगत. किंबहुना शरीराचें त्यांना भानच नसें. बुद्धीच्या जळत्या आगींत त्यांनी आपल्या शरीराचा होम केला."

"—मराठी साहित्यांत ज्ञानेश्वर आणि तुकारामानंतर गडकऱ्यांच्या एवढें सामर्थ्यवान् साहित्य कोणत्याहि लेखकाने निर्माण केलें नाही."

(दुर्वा आणि फुलें)

—"गडकऱ्यांच्या रसवंतीच्या पायांत केवळ नवशब्दांचें घुंगुर आहेत असें नाही. तर तिच्या मस्तकावर नवकल्पनांचा तेजस्वी शिरपेचहि पण झळकतो आहे. तिकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. नव–शब्द आणि नव–कल्पना हें गडकऱ्यांच्या काव्याचें स्वरूप असलें तरी उत्कट भावना हा त्यांच्या काव्याचा आत्मा आहे."

—"त्यांच्या कवितेचा ढंग, नखरा अन् दिमाखच मुळी निराळा आहे."

वरील समीक्षकांचा दृष्टिकोन सर्वस्वी चुकीचा आहे असें मी म्हणूं शकत नाही. 'Poetry is caught and not taught' हा जर खऱ्या कवितेचा रस–ग्रहणाचा दंडक आहे, तर रस–ग्राहकाच्या पद्धतींत फरक पडणारच.

'एका शून्य जगीं दिसें, तरि दिसें शून्यांत अन्या जग' तेव्हा प्रत्येक समीक्षकाच्या शब्दांत 'वेगळे'पणा असणारच. इंद्रधनुष्य रसज्ञाचें जसें लक्ष वेधून घेतें, तसें शास्त्रज्ञाचेंहि घेतें. पण दोघांच्या जाणिवेंत फरक पडतो. गोविंदाग्रजांच्या कवितेच्या बाबतींत असेंच म्हणतां येईल.

वाग्वैजयंतींतील शब्दमण्यांत 'राम' नसता तर वाचकांनी वायुपुत्रासारखे तिच्यांतील मणी वाऱ्यावर उधळून दिले असते. केशवसुत आणि गोविंदाग्रज यांच्यावर जितक्या जणांनी लिहिलें तितकें अजून (माझ्या माहितीप्रमाणे) कुणाहि अर्वाचीन कवीवर लिहिलें गेलें नाही.

'हलत्या पिंपळपानांत' प्रेमाच्या प्राप्तीसाठी आसावलेल्या गडकऱ्यांच्या मनाचें आंदोलन श्री वाळिंबे यांना दिसलें; ह्यांत तथ्यांश आहे. श्री खांडेकरांना त्यांच्या कवितेंत कल्पनाविलासापेक्षा रसोत्कटता कमी भासली. पण ते तिचें आधिक्य नाकबूल करीत असले तरी अस्तित्व नाकबूल करीत नाहीत. रे. टिळकांचा आक्षेप भाषेबद्दलचा आहे. 'राजहंसां'तील आईच्या तोंडीं 'या माझ्या मानस–सरसीं'सारखी भाषा त्यांना रसपरिपोष करणारी वाटत नाही. रसानुकूल भाषा असावी ह्या मताचा मीहि आहे. पण त्यांच्या भाषेचा तोंडवळा ठरून गेलेला आहे. पण ज्यांना तो बदलतां येणार नाही. तसें पहायला गेलें तर यशवंतांची 'आई' आणि दत्तांची 'नीज नीज माझ्या बाळा' ह्या दोन कवितांतील भाषेबद्दलहि असेंच म्हणावें लागेल. मातेच्या चिर–विरहाने व्याकुळलेला आत्मा काय पुढील शब्दांत बोलेल ?

—"माहेर मंगलाचें　　अद्वैत तापसांचें
गांभीर्य सागराचें　　औदार्य या धरेचें
नेत्रांत तेज नाचे　　त्या शांत चंद्रिकेचें
वात्सल्य गाढ पोटीं　　त्या मेघमंडळाचें"

आणि बाळाला अंगाई–गीत ऐकविणाऱ्या दत्तांच्या कवितेंतील मातेचें मन काय असें अलंकारांत नादमग्न होईल ?

"रवि गेला रे सोडुनि आकाशाला
　　धन जैसें दुर्भाग्याला
लवकरि हेही सोडितील सदनाला
　　गणगोत जसे आपणाला"

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तेव्हा कल्पना–विलासाच्या कैफांत प्रतिभेच्या हातून अशी कल्पनांची खैरात केली जाणें साहजिक आहे. त्यामुळें रसाविर्भावाला अडथळा पोचतो हेंहि खरें. समीक्षकानें फक्त त्यांत रस–निष्पत्ति होते की नाही हें पहावें. पुष्करणींत तटावरून पाय सोडून बसलेल्या रसिकाला कमल–दलांचा मखमली स्पर्श व्हावा, तसें गोविंदाग्रजांची भावरम्य कविता वाचतांना वाटतें. पुनवेच्या रात्रीं जलाशयावर चंदेरी किरणांच्या दर्शन स्पर्शाने 'जिच्यासाठी प्रेमाच्या पायघड्या' केल्या तिच्या स्मृतीने अंगांग मोहरावें, आणि भवतालचा विसर पडावा, ती जादू गोविंदाग्रजांच्या कवितेंत आहे. प्रथम प्रथम शब्दांच्या सुसंगतीकडे आणि सौंदर्याकडे लक्ष देणारे गोविंदाग्रज पुढे पुढे त्यांच्याच आहारीं गेलें. परंतु भावनाहीन कविता त्यांनी हाताच्या बोटा-वर मोजण्याइतक्या लिहिल्या असतील. त्यांत 'न साठी केलेली आर्या' आहे, 'नटमित्रास पत्र' आहे, आणि प्राथमिक शाळेंतील मुलामुलींनी म्हणण्यासाठी रचलेलें 'पंचम जॉर्ज' चें गौरव–गीतहि आहे. पण हे अपवाद सोडले तर त्यांची सारी कविता—

'हृदयचि भरलें कवनरसानें उचंबळुनि आलें
रूप अश्रुमय भरुनि काढितें नयनांचे प्याले
कवनजलाचा ओघ चालला विश्व त्यांत न्हालें
नीरसतेच्या मालिन्याचें नाम नष्ट झालें
हृदयाचा केला डोला
कवितेनें आत्मा ओला
त्यावरी बसुनि घे झोला

अशी म्हणजे 'कवन भुवन हें कवनचि जीवन...' इतकी जीवनाशीं एकरूप झालेली आहे.

अशा कवितेसाठी जगणाऱ्या गोविंदाग्रजांच्या कवितेंत रसोत्कटतेची कमतरता भासेलच कशी ?

आता त्यांची कविता कसकशी साकारत गेली, हें पाहूं या ! त्यांची पहिली कविता—

" चष्मा लावुनि डोळ्यांडोकिस पागोटि तांबडी घाली
काठी टेकित टेकित येउनि बैसे पथारिच्या खाली

वयाच्या अकराव्या वर्षी लिहिलेल्या या दोन चरणांच्या कवितेला देखील त्यांनी आपल्या वडील बंधूंची मदत घेतली आहे (असें ते म्हणतात). ह्या वयांत शाळेच्या हस्त–लिखितांत लिहिणारीं मुलेंहि याहून सरस लिहितात. पण तीं तेवढ्यापुरतीच. तेव्हा गोविंदाग्रजांच्या यशाचें बीज त्यांच्या पहिल्या कवितेच्या स्फूर्तींत नाही. तींत प्रतिभेपेक्षा प्रयत्नाचाच भाग अधिक आहे. पण पुढे ज्या झंझावाती गतीनें त्यांच्या प्रतिभेनें ब्रह्माण्डांत संचार केला तो तिचा वेग पहिला की मग रसिक वाचक त्यांच्याप्रमाणे म्हणतो,

" बुद्धीचा तुटला वीर
आशामय होत शरीर
जळि बुडे जलधिचें तीर "

दोन पासून दोनशें ओळीपर्यंतची कविता एका बैठकींत लिहिणाऱ्या गोविंदाग्रजांच्या प्रतिभेची ठेवण मोठी विलक्षण असली पाहिजे यांत शंका नाही.

संत, पंडित आणि शाहीर यांच्या वाङ्मयाच्या सखोल वाचनावर त्यांची भावना पोसली गेली होती. अहर्निश चिंतनामुळे भाषेला सौष्ठव प्राप्त झालें होतें. नव्या–जुन्या साहित्य–श्रेष्ठांबद्दल त्यांना आदर वाटत होता. तो त्यांनी 'सत्सुमदाम' 'महाराष्ट्र–गीत' 'निजलेल्या बाल–कवीस' 'पुत्रशोक' आणि इतर कांही कवितांतून व्यक्त केला आहे. ज्ञानेश्वरांपासून तो बालकवींपर्यंत अनेकांचे उल्लेख त्यांनी केले आहेत. त्यांतील कांही पहा:—

" ज्ञानदेवाच्या हृदयीं बसुनि कोडें
भाविकांचें जी उकलि गूढ कोडें "
" गोकुळीच्या चोरास धरुनि पायीं
बसवि जात्यावर जेधवां जनाई "
" अभंगांनी ही करि अभंग वाणी
खरा देहूचा जातिवंत वाणी "
" रसवंतीच्या पहिल्या बाळा मुकुंदराजाला
पहिला वहिला अष्टांगांनी प्रणाम हा त्याला "
" तुला जागवी ऐस पहाटे गवळी गोपाळ
धार दुधाची काढित काढित होनाजी बाळ "

बालकवींबद्दल तर त्यांना नितांत आदर वाटत होता हें त्यांच्यावर त्यांनी लिहिलेल्या दीर्घानी कवितेवरून दिसून येतें. त्यांचा गौरव त्यांनी पुढील शब्दांत केलेला आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'नव्या सृष्टिच्या नव्या यशाचा तूंच शिलेदार
नव कवितेच्या जरिपटक्याचा तुलाच अधिकार'

एवढेंच नव्हे तर जेव्हा, 'कांही इंग्रजी कविता वाचून'

'खेद वाटला—तोंच आठवे बालकवीची रसवंती,
धीर जरा वाटे चित्तीं'

असें ते म्हणतात. परंतु 'नव्याजुन्यांच्या या प्रेमळ पाइकाच्या' वाङ्मय-व्यासंगांत विरक्ति निर्माण करणारी एक घटना घडली. त्यांच्या मनाचा कोनाकोपरा दग्ध करून टाकणारा वणवा पेटविणारी ठिणगी कुठून तरी पडली. त्याशिवाय त्यांनी,

'देवा अंतरीं आग भडकुनी जळून जाऊं दे,
त्या ज्वालांमधि माझी ज्वाला मिसळुन वाहूं दे'

असें म्हटलें नसतें. 'अवेळीं ओरडणाऱ्या कोकिळेस,'—

'दूर कराया उदासीनता
गाच गडे ! अंगाई गीता'

अशी विनंती केली नसती. कुणातरी 'हृदय शारदेस' उद्देशून ते लिहीत होते—

'तुझ्या मनाचा तुझ्या जीवाचा एक एक बोल
मम कवितेच्या जादूलागीं ठरवील्च फोल !'

'सुकला चुकला जीव आजवर तुजवांचुनि फिरता
हृदयशारदे ! शब्दशारदा नको मला आता'

कुठल्यातरी 'प्रीतिदेवतेच्या पायामधला घुंगुरवाळा' ते होऊं इच्छित होते. पण नंतर

'देवी दर्शन दुर्लभ झाली
आशालेशहि नच कांही
संसाराची होऊनि भाषा
जीवन कवनांतुनि वाही'

असें झालें. त्यामुळे त्यांना 'गीतविरक्ति आली. तेव्हा ते म्हणतात—

'गीत कळावें जीस नसे ती
दिशा धुंडिल्या जरि दाही !

'जिवंत फुलवंतीचा असला दुःखप्रद सहवास' त्यांना एका जागीं स्थिरूं देईना आणि कुठल्याहि विषयांत विरूं देईना, आपल्या विपण्ण मनाला विरंगुळा वाटावा म्हणून कधी घुबडाच्या धुत्कारांत त्यांनी आपला स्वर मिळविला, तर कधी स्मशानांतील भुतांच्या गाण्याशीं ते समरस झाले. माझ्या म्हणण्याची प्रचीति येण्यासाठी रसिकांनी त्यांच्या 'वेडा' कवितेंतील पुढील चरण—

'त्याचें वेड कशांतुनी उपजलें कोणास हें नाकळे—
त्याचें त्यासहि नाकळे, मज गमे देवाहि ना ठाउकें !'

आणि 'माझा मृत्युलेख' मधील—

'यावज्जीवहि 'काय मी' न कळलें आप्तांप्रती नीटसें
मित्रांतेंहि कळें न गूढ न कळें माझें मलाहि तसें'

हे चरण वाचून पहावेत.

गोविंदाग्रजांच्या जीवनाची ही बाजू ज्यांनी जाणली आहे तेच त्यांच्या अनुभूतींशीं समरसूं शकतील. त्यांच्या कवितेंतील सारे दोष विसरून तिच्या एका नादमग्नतेवर खूष होतील. यमुनेच्या लहरींवर श्रीहरीच्या बासरीचे स्वर रेषा-वलयांकित झालेले दिसले असते तर राधेच्या वेड्या जिवाला जें समाधान मिळालें असतें तेंच समाधान गोविंदाग्रजांच्या 'वाग्वैजयंतींतील' उदास-रम्य पुष्पांच्या रंगांत, सौगंधांत आणि मकरंदांत रसिक मनाला मिळतें.

त्यांच्या कवितेबद्दल बोलतांना लोक त्यांना चटकन प्रेमाचे शाहीर म्हणतात. कुणी कौतुकानें तर कुणी कुत्सितपणानें. पण ज्या तऱ्हेच्या प्रेमाची लोक मनांत अपेक्षा करितात आणि जनांत टर उडवितात, त्याच तऱ्हेच्या प्रेमावर गोविंदाग्रजांनी बरेचसें लिहिलें. मनांतलें गाणें जनांत होऊं नये म्हणून काळजी घेणारे जग अशीच कविता मिटक्या मारीत वाटते. आणि या प्रेमाहूनहि वेगळ्या विषयांवर त्यांनी चांगलें लिहिलें ह्याचा ह्या टीकाकारांना कसा विसर पडला ? उलट त्यांच्या उत्कट आणि सात्त्विक प्रेमामुळे त्यांच्या कित्येक कविता मराठी साहित्याचीं भूषणें ठरलीं असें मी म्हणेन. ते विक्षिप्त होते ही त्यांच्या स्वभावाची बाब झाली, साहित्याची नव्हे. पण त्यांतूनच उद्भवलेल्या छंदांच्या वेडांत त्यांच्या रसवंतीने 'नवशब्दांचे घुंगुर बांधून शिणलेल्या जिवांना ताजेतवानें केलें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अहोरात्र कवितेच्या कैफांत असलेल्या त्यांच्या प्रतिभेने महाराष्ट्र–शारदेला नजर कलेले नजराणे पहा.—

मुरली—स्वतःलाच 'मुरलीचे शाहीर' म्हणविणाऱ्या गोविंदाग्रजांची वेचाळीस कडव्यांची ही कविता त्यांच्या भावसमाधीची साक्ष देते. प्रस्तावनेंत ते लिहितात, "मनुष्याच्या आयुष्यांत असा एक काळ एकदा तरी येतोच की ज्यावेळीं ईश्वराचें अस्तित्व भावपूर्ण हृदयाला पटतें आणि तेव्हा मात्र बुद्धिप्रधान मस्तकाचें समाधान करण्यासाठी तळमळणारा जीवात्मा ईश्वरी साक्षात्काराची याचना करीत असतो. या गाण्यांत ईश्वरी उत्तराला 'मुरलीध्वनि' कल्पून त्यासाठी झुरणाऱ्या राधेच्या पांच चढत्या स्थिति दाखविल्या आहेत."

मुरलीध्वनीनें वेड्या झालेल्या राधेच्या मनाची ही अवस्था पहा—

'जन्माचें झालें चीज
कायमची मेली नीज
विश्वाचें गवसें बीज
चिद्वृत्ति त्यांत अवतरलि'

आता मुरली–स्वरांतून ओघळलेलें मोत्यांच्या मोलाचे बोल वेचूं इच्छिणाऱ्या राधेची आर्तता पहा—

'बोल, बोल तव विनमोल
जिवाचें देइन मोल
परि बोल एकदा बोल
नातरी राधिका मुकली'

आणि अखेरच्या सीमेपलीकडील, मुक्तीमुळे महिरलेल्या मनाला विसरलेली राधा काय म्हणते पहा—

'उरलें न शीत वा उष्ण
कांही न शुभ वा कृष्ण
एकरूप राधाकृष्ण'

वाचकांसाठी हीं कांही कडवीं मी सादर केलीं आहेत. पण ह्या कवितेंतील चरणाचरणांत रसिक मनाचें रेशीम गुंतून राहावें इतकी ती सरस आहे. तिच्यांतील शब्द न् शब्द भावनेला चाळवीत येतो. गूढार्थ न कळणाऱ्यालाहि मोहोरदार रचनेने धुंद करणाऱ्या अध्यात्माचा ओनामा न जाणणाऱ्यालाहि मुग्ध करणाऱ्या मुरलींतील कल्पनेंत कुतुबमिनाराची उंची आहे, रचनेंत ताजमहालाची कलाकुसर आहे आणि भावनेंत यमुनेचा नीलिमा आहे.

प्रेम आणि मरण—ही त्यांच्या कवितांतील उत्कृष्ट रूपकात्मक कविता होय. मोकळ्या मैदानांत वाढलेल्या एका वृक्षाची आणि मेघाच्या आवरणांतून डोकावणाऱ्या विजेची 'डोळे भेट' होते. वृक्षाच्या मनांत प्रीतीच्या जहरी लहरींचा संचार होतो. त्यामुळे तो वेडा होतो, जातिधर्माला मुकतो, जगावेगळा वागतो, मुसळधार पाऊस पडला तरी त्याला टवटवी येत नाही. वाऱ्याच्या वेगाने तो हालत नाही अगर कशानेहि फुलत नाही. प्रीतीचा रोग जडलेल्या हठयोग्याच्या स्थितींत तो पडून राहतो. प्रेमाचें (प्र) दर्शन करणारे कुणी त्याचीं अवस्था पाहून सहस्र जिव्हांनी वडबडतात, कुणी हसतात, कुणी कीव करतात. देव देखील त्याला उपदेश करतात. 'ही भलती आशा सोड' म्हणून त्याची विनवणी करतात. पण नाही. प्रत्येकाला त्याचें आपलें एकच उत्तर—'भेटवी मजला –जीविच्या जिवाची बाला–एकदा,' प्रेमाने बद्ध झालेल्या त्याच्या मनाला हिताच्या गोष्टी कान असून ऐकूं येत नाहीत आणि डोळे असून दिसत नाहीत.

तो म्हणतो, 'क्षण एक पुरे प्रेमाचा
वर्षाव पडो मरणांचा'

प्रियेच्या स्पर्शासाठी मरणांचा वर्षाव झेलण्यासाठी सिद्ध झालेल्या त्या हठयोग्याला अखेरीं इच्छित फळाची प्राप्ति होते. गगनांतील ती चंचल बाला—

'कडकडे–त्यावरी पडे'

आणि तिचा स्पर्श होतांच

'वृक्ष उन्मळला–दुभंगून खाली पडला'

पण त्याच क्षणीं कधीहि स्मिताची सुरकुती न पडणाऱ्या त्याच्या मुखावर हर्षाच्या लहरी उठल्या, त्याचीं पानें हिरवळलीं आणि त्याच्या कळ्यांचीं फुलें झालीं.

चिरंतन प्रेमाच्या प्राप्तीसाठी सिद्ध झालेल्यांच्या यातना घोर खऱ्या, पण त्यापासून मिळणाऱ्या ब्रह्मानंदाची कल्पना अनुभूतीवाचून नाही येणार. जगाच्या बाजारांत नाण्याच्या झंकारावर नाचणाऱ्या बेगडी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रीतीने नजर केलेल्या विडयाने घटकाभर मन रंगलें तरी जन्मभर जीवन दुभंगते.

'क्षणीं पांढरा, क्षणींच काळा
रंग आवडे असा जगाला
ठाव तयाचा कुणा न कळला'

मग अशा जगांत राहण्यापेक्षा तेजस्वी प्रीतीच्या स्पर्शाने येणारा मृत्यु काय वाईट ?

'प्रेम आणि मरण' या रूपकात्मक कवितेंतून आदर्श प्रेमपाठ कवींनी आपल्याला दिला आहे.

'राजहंस माझा निजला' ही गोविंदाग्रजांची सर्वात गाजलेली कविता. मराठी रसिकांच्या ओठीं तिच्यांतील कित्येक चरण आज इतकीं वर्षें शब्द-बद्ध होऊन राहिले आहेत. पतिनिधनानंतर अल्पावधींतच एकुलत्या एक मुलाचें निधन पाहण्याचा दुःसह प्रसंग आलेल्या विधवेचें हें भाव-चित्रण आहे. तें वास्तव आहे, अवास्तव आहे की अतिरंजित आहे हा टीकाकारांचा दृष्टिकोन आहे. त्याबद्दल मागे उल्लेख येऊन गेलेला आहे. पण पुढील भावदर्शन कुणालाहि वेड लावणारें आहे. फक्त कवितेकडे पहाण्याची दृष्टि पूर्वग्रह-दूषित नसावी.

—'मुलाच्या निधनाने शोकांत बुडालेल्या, मनावरील ताबा सुटलेल्या, मातेच्या पिळलेल्या अंतःड्यांतून निघालेले, आसवांत भिजलेले बोल ऐका......

'वाजवूं नका पाऊल
लागेल तया चाहूल
झोपेचा हलका फूल'

तिचें त्यावरील प्रेम पाहा—

'नयनांच्या शिंपांमधुनी
अश्रूंचे मौक्तिक सुमणी
मीं दिले तया काढोनी'

मोत्यांचा चार असला—राजहंस खाउनि निजला'

मातृवात्सल्याने ओथंबलेलें असें चित्रण मराठी कवितेंत कुठे आहे काय ? दोषच सांगावयाचा झाला तर कविता दीर्घ वाटते, कंटाळवाणी नव्हे.

वरील तीन अमर गीतांनंतर त्यांच्या कल्पना-विलासात्मक ज्या कविता आहेत त्यांचा परामर्श घेऊं.

चिमुकल्या हातापायाची, चिमुकल्या बांध्याची, सुंदर आणि गोंडस अशी दहा वर्षांची बालिका पाहून गोविंदाग्रज 'चिमुकलीच कविता' लिहावयास बसले, आणि हां हां म्हणतां ती शंभराहुन अधिक ओळींची झाली. नाही तरी चंडोलाला रागदारी गातांना आकाशाची उंची गाठावी लागते. घरट्याभोवती त्याची प्रतिभा भिरभिरत नाही. तिच्या भिवयांत त्यांना राम-लक्ष्मणाचीं धनुष्यें दिसूं लागलीं. महाकवीच्या कल्पनेंतील भावपूर्तीच प्रकटली आहे की काय, असा त्यांना भास झाला. दगडाचा देवहि चरणाशीं आणणारें सामर्थ्य तिच्या मांगल्यांत आहे असें त्यांना वाटूं लागलें आणि अखेरीस तिला मूर्तिमंत कविताच कल्पून ते लिहितात—

'मम हृदयाच्या हिंदोळ्यावर चल ये घे झोले
त्यांतुनि निघत्या कवनश्वासें विश्व सहज डोले!'

सौंदर्य-दर्शनाने वेडें होणें हा जातिवंत कवीप्रमाणे गोविंदाग्रजांचाहि धर्म होता. प्रा. माटे म्हणतात त्याप्रमाणे इतर कवींनी आपल्या प्रतिभेचा क्षुद्र रिठा घासून घासून पांच-दहा चरणांत ही कविता आटोपली असती.

त्यांच्या दोन्ही 'अरुणां'तील कल्पना-तरंग असाच भावरम्य आहे.

उदा.—'कुणी महात्मा विश्वोद्धारास्तव तप आचरितां
उचंबळुनि का वाहत त्याच्या हृदयाची सरिता ?'

'बागेंत बागडणाऱ्या लहानग्यास' पाहून त्यांची तरल कल्पना कशी भरारते पहा—

'शब्दांवाचुनि मंजुळ गाणें
(अर्थ तयाचा देवचि जाणें !)
गाइल माझें गोजिरवाणें,
सप्त सुरांपरि या वाऱ्यावरि विरुनी जाशिल पार !

तशीच 'पांखरा'बरोबर विहरतांना, 'कळ्यांची फुलें कशीं झाली ?' हें सांगतांना 'घुंगुरवाळ्या'च्या तालावर नाचतांना, 'हलक्या पिंपळपाना'कडे पाहतांना, इत्यादि अनेक ठिकाणीं त्यांच्या कल्पनेची तरलता निदर्शनास येते.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

परंतु अहर्निश कल्पना–विलासांत गुंग असलेल्या त्यांच्या मनाला पुढे पुढे जीवन असह्य झालें. दुथडी भरून वाहणाऱ्या उल्हास नदीच्या तीरावरील प्रेमाचे उन्मेष ओसरून गेले होते. आणि—

" 'शोकच शेष आज उरला प्रेमांतुनी अंतरीं,'

असा जीवनाची भग्नावस्था दर्शविणारा एक चरण त्यांना मृत्यूपूर्वी एक वर्ष म्हणजे १९१८ सालीं 'एका जुन्या श्लोकाच्या आठवणींत' सापडला. आचार्य अत्रे लिहितात, 'गडकऱ्यांच्या सर्व प्रेमकविता एकाच व्यक्तीला उद्देशून केल्या आहेत असें नव्हे.' मी त्या एकाच व्यक्तीवर केल्या आहेत असेंहि म्हणत नाही. पण समजा त्या तशा असल्या तर त्यांच्या व्यक्तित्वाला त्यामुळे बाध येतो असें मला वाटत नाही. किंबहुना 'सर्वच उत्तम वाङ्मय आत्मचरित्रात्मक असतें' ह्या आचार्य अत्र्यांच्याच शब्दांवरून मी असें म्हणूं शकतों की आत्मानुभूतीचें गुलाबपाणी त्यांनी आपल्या भाव–कळ्यांवर शिंपलें म्हणून त्यांचीं अशीं टवटवीत फुलें झालीं. त्यांच्या आस्वादाने वाचक मोहरतो, बाह्य जगाला विसरतो तो ह्याच अनुभूतीच्या उत्कटतेमुळे.

माझ्या मतें त्यांची कविता इतकी हृद्रम्य असण्याचें कारण त्यांच्या वाट्याला आलेली दारुण निराशा ही होय. शोकाच्या डोहांत जिने त्यांना लोटलें तिला ते म्हणतात,—

'केल्या ज्याच्या पायघड्या मी तुझ्या पावलासाठी
त्या हृदयाला तुडवुनि गेलिस·················'

वाढत्या निराशेचा चटका विसरण्यासाठी त्यांनी घुबडाच्या घूत्कारांत आपला स्वर मिळविला आणि त्याला विचारलें—

'प्रीति असे का ठाउक तुजला ?
जीव कधी का दुःखें सुजला ?'

सजीवतेच्या वेगडी चाळ्याला कंटाळलेल्या त्यांच्या जीवाने स्मशानांतील भयाण शांततेचा आश्रय धरिला. 'कलगीचें गाणें' गायिलें. तें गातांना त्यांना आपल्या कवितांतील 'वेगळे'पणा बद्दल विश्वास वाटला, म्हणून

'तोच तयावरि करिल तुरा
वेडा जो मनि खराखुरा'

त्यांनीं असें म्हटलें.

मला वाटतें त्यांची 'फुटकी तपेली' अशाच अत्यंत निराशावस्थेंत लिहिली गेली असावी. कवितेचा कैफ चढत चालला होता, गाण्यावाचून दुसरें जगणें उरलें नव्हतें, अशा वेळीं फुटक्या तपेलींतून त्यांनीं अंतरिच्या एकांताचें गूड वदविलें. भावनाशील मन चिंतनाच्या आवर्तनाने बधिर झालें की नेणिवेच्या आणि जाणिवेच्या सीमेवरून ज्या शब्दांत बोलतें तें गूढगुंजनाचें उदाहरण म्हणून आपण घेऊं या !

'हर्ष–खेद ते मावळले
हास्य निमालें;
अश्रु पळाले;
कण्टकशल्यें बोथटलीं,
मखमालीची लव वठली;
कांही न दिसे दृष्टीला
प्रकाश गेला,
तिमिर हरपला;
काय म्हणावें या स्थितिला ?
झपूर्झा ! गडे झपूर्झा ! '

कलावंताच्या मनाची अशी एक अवस्था येते की त्यावेळेस त्याची शब्दांवर हुकमत राहत नाही. कुणी तरी आंतून ते बोल वदविते. त्यांचें कविमन पुढेपुढे इतकें अणुरेणुमय झालें होतें की स्वतःचें असें कांही त्यांना उरलें नव्हतें. ह्या अवस्थेंतून फुटक्या तपेलीकडे पहा—

'ब्रह्माण्डाची करा तपेली !
माझी ओंळख पाणि तिच्यांतिल
कैक अनंतें तयांत जिरतिल
माझ्यावाचुनि सारें विरतिल,'

× × ×

सर्वस्वाची करा तपेली
माझ्या पाण्याने भरलेली,
पाहुनि तिजला तीन्ही काळीं,
खुदी ओळखा क्या है अंदर ! '

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्यांच्या सर्व कवितांचें असें पृथक्करण करण्याची जरूरी नाही. आजवर अनेकांनी तें केलें आहे. पण अखेरपर्यंत सग्यासोयऱ्यांना, मित्रांना एवढेंच नव्हे तर स्वतःला देखील ज्याचें जीवन आकलन झालें नाही, तें 'आपल्याला कळलें आहे' असें जेव्हा एखादा पुढे सांगतो, तेव्हा त्याच्यापासून सहृदयतेची अपेक्षा त्या लेखकाचे चाहते करीत असतात. हें जाणूनच मी हें वरील विवेचन केलें आहे आणि पुढील निष्कर्षाकडे वळणार आहे.

× × ×

कलावंताच्या मनांत सिद्धीपेक्षा संकल्पांचाच फुलोरा अधिक असल्यामुळे इतरांना त्याच्या व्यक्तित्वाचा अंदाज करणें कठीण जातें. फुलत्या रसवंतीचा ज्यांच्यावर जन्मजात वरदहस्त होता, पण पुढे ज्या दिव्यप्रेमाला ते पारखे झाले.

'दर्शन किंवा स्मरण पुरे
तन्मयता देहीं प्रसरे'

अशा त्या प्रेमाच्या प्रतीक्षेंत त्यांची उदासीनता वाढत गेली. त्यांच्या रसवंतीने एकापेक्षा एक सरस कविता फुलविल्या तरी त्यांच्या सौरभांत उदासीनता आलीच. ती येणें अपरिहार्य होते.

'जो तो या जगतावरी पसरतो छाया मनाची सदा'

असें ते ओसाड रानांतील फुलाबद्दल म्हणतात, तें त्यांच्या स्वतःच्याच कवितेला लागू पडतें.

'हृदयीं भरला जो त्रास—तो कविताचरणीं प्रास'

अशा अवस्थेंत कवीला तरी आपली जीवित–नौका कोणत्या दिशेने जात आहे याची कल्पना कशी असणार?

'माझी सृष्टिच जातां झालों जिवंतपणिं मी भूत
बांधितसे मज येथे नसल्या आशेचें हें सूत'

ही त्यांच्या डोळ्यांना पारखी झालेली सृष्टि कोणती?

'कशास आशा नसती आता झालें तें गेलें
सुकलें फूल न देत वास जरि अश्रूंनी भिजलें'

असें 'झालें तें गेलें' सहज लिहितां बोलतां येतें, पण स्मृति जागी झाली की उधाण भरतीप्रमाणें तिचें पाणी आकाशाला भिडतें, क्षितिजें त्यांत बुडतात आणि त्या—

'फसव्या पाण्यावरी पोहुनी दम कोंडुनि मरतां मरतां
गोविंदाग्रज म्हणे जीविता! लाभ तुझा नच या परता'

असें म्हणण्याची पाळी येते.

पन्हाळगडच्या पठारावर त्यांनी नवरंगी 'फुलें वेचिलीं...पण' जिवंत फुलावंतीच्या दुःखप्रद आठवणीमुळे त्यांना ती नकोशी वाटली. 'देवाने जीवनांत असा निष्ठुरपणाचा खेळ मांडिला आहे त्याअर्थी त्याच्या मनांत कसला तरी मेळ बसवावयाचा असेल' अशी ते आपल्या मनाची समजूत करून घेतात. तरी पण अखेरपर्यंत 'प्रीतीच्या उपनेत्रावांचुनि' त्यांच्या प्रतिभेने पाऊल टाकलेलें नाही.

हृदयशारदेचें आकर्षण नसतें तर त्यांना जगांत शून्यता भासली नसती. कदाचित् 'पीडित कवि' म्हणून ते जगले असते. 'सत्सुमदाम' 'देवल' 'पानिपतचा फटका' 'विचार' 'ओसाड रानांतील एकच फूल' 'गरिबीचें गाणें' अगर 'महाराष्ट्र–गीत' अशासारख्या कविता त्यांनी लिहिल्या असत्या. प्रसंगपरत्वें त्यांनी वधूवरांस श्लोकबद्ध आहेर केला असता. कुणाला यशोगान गायिलें असतें. किंवा अशाच कांही प्रासंगिक अगर अप्रासंगिक कविता ते लिहीत राहिले असते. किंवा कुणी सांगावें, त्यांचें लेखनहि बंद पडलें असतें.

× × ×

'वाग्वैजयंतींत शब्दमणी अगणित' आहेत हा त्यांच्या भाषेच्या व्यासंगाचा परिणाम म्हणतां येईल. 'दसरा' आणि इतर कवितांतून त्यांनी सामाजिक रूढींचा, नीतीचा जो उल्लेख केला आहे, तो कदाचित् तत्कालीन परिस्थितीचा पडसाद असेल, अगर केशवसुतांच्या कविता–वाचनाचा परिणाम असेल; परंतु त्यांचें अस्तित्व ह्यांत नाही. नक्षत्रांनी विखुरलेल्या आकाशींच्या गोल घुमटाखाली रात्रींच्या चढत्या प्रहरीं हिरवळीवर ध्यानस्थ बसलेल्या आस्तिकाला अनंताचें अस्तित्व पटावे, पण पटवून देतां येऊं नये, ही स्थिति गोविंदाग्रजांची कविता वाचणारांची होते. वाग्वैजयंती हातावेगळी केली की वाचकांचें मन—

'फुलाफुलांतुनि रंगत होतीं मधुर सुगंधी स्वप्नें'

हेंच उद्गार काढतें, अंबरींच्या झुंबराला लटकलेल्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असंख्य नक्षत्रांचा मनावर जो परिणाम होतो, तो वाग्वैजयंतीच्या वाचनाने होतो. त्यांच्या जित्या जिवानें फुलविलेल्या अमर-पुष्पांच्या ह्या सुगंधाचा आस्वाद घ्या……

'पूर्वी जग अंतरतां हृदयीं कांही तरी होतें
परि या कालीं तूं त्याजितां मग काय तिथे उरतें ?'

× × ×

'आधी आशा तुटतां सुटलें बंधन जगताचें
उदास हृदया वेड लागलें चढत्या कवितेचें'

× × ×

'विषण्ण मानस, उदास जीवन, पीत निराशागरा
हृदय तडफडें दुखाग्नीनें मुकलें सुखसागरा'

अशी वाग्वैजयंतीच्या दलादलांवर विखुरलेली रस-रंगसंगति पाहिली की—

'गाणें माझें, काळा ! पाडिल चराचराला भुलावणी
जो तो होइल ठायिंच वेडा……'

असा तो काळाला बजावण्याइतका आत्मविश्वास त्यांच्यांत उत्पन्न झाला होता, तो सार्थ वाटतो. कवितेसाठी आणि प्रेमासाठी जगतांना जगाला अमर-रसाचे प्याले ओतून देणाऱ्या गोविंदाग्रजांच्या जीवनाचेंच गाणें झालें होतें.

'रचणें काळोखावरती
मग वाऱ्याच्या इमारती'

हा त्यांच्या उदास मनाचा उद्योग होऊन राहिला होता. त्यांच्या मनःस्थितीचें ज्याला स्वानुभूतीनें आकलन होईल त्याला मीं चितारलेलें हें भाव-चित्र रुचेल असें मला वाटतें. नियती ही स्त्री कल्पून कवीच्या तोंडून पुढील भाव वदविले आहेत.

"—एके दिवशीं सायंकाळीं ती माझ्याकडे आली. आपल्या गुलाबी रंगाला साजेसं अस्मानी वस्त्र तिनं परिधान केलं होतं. तिच्या हातांत काचेचे दोन पेले होते. त्या पेल्यांत संध्यारंग विरघळलेले मला दिसले. तिच्या कटाक्षांत काव्य आणि ओठाआड तत्त्वज्ञान लपलं होतं. तिच्या अनपेक्षित येण्यानं भाव-मूढ झाल्यामुळं मी विचारायचं म्हणूनच तिला विचारलं—

'हें काय ? माझी अपेक्षा मुद्धा नव्हती तूं येशील अशी !'

'राहवेना म्हणून आलें. इतकीं वर्षं मनांत बाळगिलेली अपेक्षा बोलून दाखविण्याची इच्छा झाली म्हणून आलें,' ती उत्तरली.

आणि त्या दोन पेल्यांतील एक माझ्या हातांत देत ती म्हणाली—

'हा तूं घे ! यांतील थेंब नि थेंब तूं प्राशन कर !'

तिच्यावरील अनन्य प्रीतीनं मी तो जांभुळी रंगाचा पेला हातीं घेतला, आणि पहिल्याच घोटांत माझा गळा करपून गेला. डोळे निळे झाले. तरी ती निर्विकार होती. नंतर दुसरा पेला माझ्या हातीं देत ती म्हणाली,

'ह्यांतील पेयाचा साऱ्या विश्वावर अभिषेक कर ! त्या थेंबाथेंबांतून तुझ्या कीर्तीच्या अमरगीताचे बोल निनादतील ! मघाचं विष होतं ! हें पीयूष आहे.'

इतकं बोलून तिनं माझ्या नजरेला नजर लावली. मी तटस्थ झालों. मला हलवेना—बोलवेना.

'जा ! क्षणाचाहि विलंब नको. जा !' एवढं बोलून ती निघून गेली. तिच्या वाणींत वज्राचा वजनदारपणा, कट्यारीची धार, दावानलाची दाहकता, मदिरेची मोहकता आणि तरीहि कुसुमाची कोमलता होती !"

गोविंदाग्रज आज असते तर त्यांनी आपली कविता मुक्त-छंदांत अशी लिहिली असती—

"असह्य झाल्या
ओल्या जखमांतील वेदना
म्हणूनि फुंकरित बसलों त्यांना
दिवस-रात्रभर,
कधी स्मशानीं घुबडासंगें
काळोखावर लिहिलें गाणें

By all means let Shelley's memory, as that of a divine poet, be spared. But the writers of half a score of Lives of Shelley are not poets and not exempt from the commands of humanity and honour. They should have a warmer word for her, who in her youth was left adrift and died by her own act.

(कांहीहि झालें तरी शेलीची आठवण एक स्वर्गीय कवि म्हणूनच राहावी. परंतु शेलीच्या चरित्रावर लिहिणारे अनेकजण कवि नव्हते, त्यामुळे सहानुभूतीच्या भावनेने त्यांनी त्यांच्याकडे पाहिलें नाही. यौवनांत ज्याने एकाकी राहून दारुण यातना सोसल्या, त्याच्याबद्दल अधिक आपुलकीच्या ऊबदार भाषेंत त्यांनी त्याच्या कवितांचा परामर्श घ्यावयास हवा होता.)

वरील विवेचन हें स्वैर रूपांतर आहे, शब्दशः भाषांतर नव्हे.

यावरून असें म्हणतां येईल की, गोविंदाग्रजांची कविता ही उदास-रम्य आहे. तिचे बोल सतारीचे नाहीत, एकतारीचे आहेत. कृष्णपक्षांतील रात्रीच्या चढत्या अंधारांत एखादा बैरागी कशाचीहि साथ न घेतां, गात जावा आणि रस्त्यालगतच्या एखाद्या गवाक्षांतील श्रांत जीव मंत्रमुग्ध व्हावा, तशी त्यांची कविता वाटते. जन्मभर अचेतन मनाच्या गुंगींत कर्तव्याची वाट चालतांना सायंकालीन सावल्यांनी त्यांना उदास केलें आणि ती उदासीनता दूर करावी म्हणून त्यांनी एकतारीवर गायिलेल्या मुक्या मनाचीं गाणीं काळोखाच्या तबकडीवर मुद्रित केलीं. त्या गीतांनी आज तीन तपें मराठी मनाची पकड घेतली आहे.

× × ×

रसिकहो ! मला सांगायचें होतें तें मी संपविलें. संपलें असें मी म्हणत नाही. कारण 'वाग्वैजयंतींतील' प्रत्येक पुष्पाचा आस्वाद घ्यायचा म्हटलें तर तितकाच किंबहुना तिच्याहूनहि अधिक ग्रंथ-विस्तार होईल. तरीपण रसिकांचें '**जिव्हार, आणि शारदेचें लावण्यरत्न भांडार**' अशी ही वाग्वैजयंती भावार्थानें मीं आपणासमोर ठेविलेली आहे. ह्यांत माझी भूमिका मुख्यत: समीक्षकाची आहे हें मी आधीच सांगून ठेवितों. कलावंताच्या जीवनाकडे आणि कलेकडे टीकाकारांच्या दृष्टिकोनांतून मला पाहतां येत नाही; हा माझा स्वभाव-दोष मी आपणांस सांगितला म्हणजे मग माझ्या विवेचनांतील दोषांकडे सहृदयतेने आपण पहाल. अखेरीस मी आपणा श्रोत्यांचें मन:पूर्वक आभार मानतों. कारण

'वक्ता हा वक्ताचि नोहे श्रोतेनिविण'

या उक्तीप्रमाणे तुमच्या उत्कंठेशिवाय मी इतका रंगलों नसतों. तसेंच **गडकरी स्मारक समितीनें** मला आपले विचार व्यक्त करण्याची संधि दिल्याबद्दल मी—

'राहीन तिचा चिरकाल ऋणी'

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संमेलन, अधिवेशन १८ वें, तुमसर

संत तुकडोजी महाराजांचें उद्घाटनाचें भाषण

जमलेल्या साहित्यिक मंडळीनो आणि या तुमसरच्या आणि आजुबाजूच्या सज्जन बंधुभगिनींनो !

साहित्याच्या दृष्टीने मी फारसा जाणकार नसून माझ्या हातून या संम्मेलनाचें उद्घाटन या साहित्यिकांनी ठरविलें त्यावरून मी समजूं शकलों की, साहित्य आता खेड्यांतील लोकांना वर उचलण्याला तयार झालें आहे. खेड्यांतील जनतेला अनेक जीवनोपयोगी वस्तु, ज्यांना मी साहित्य समजतों, मिळवून देण्याची व तशी चालना देण्याची प्रवृत्ति साहित्यिकांत निर्माण झाली आहे. ह्यावरून, संस्कृतीचें ज्ञान खेड्यांतील जनतेने विसरूं नये असें साहित्यिकांच्या मनांत आलें असें मी समजतों.

दोन वर्षांपूर्वी मोझरींत विदर्भ साहित्य संमेलन भरलें त्यावेळीं मीं बोलतांना साहित्याचा संबंध जीवनाशीं जोडून कांही शब्द साहित्यिकांसमोर रुजू केले. मला बरेचदा साहित्याच्या उच्च भावना साहित्यिक मंडळी सांगत. प्रत्यक्षांत मात्र पाहण्यांत निराळेंच येई. ही फारकत मला जाणवत असे. मला आता वाटूं लागलें आहे की, हें जीवन आणि साहित्यांतील अंतर कमी करण्याची दृष्टि साहित्यिकांत येऊं लागली आहे. वेदान्तांतहि ही जीवनभावना आता येवूं लागली आहे. तसें म्हटलें तर प्रत्येकांतच आता आत्मनिरीक्षणाची भावना वाढली आहे, यांत संशय नाही.

मी साहित्य पुस्तकांतून शिकलों नाही. अफाट जनसागरांतून, हृदयाच्या गाभाऱ्यांतून, आंतरिक उचंबळींतून मी साहित्य शिकलों. साहित्याची कल्पना मला ह्या जनसागरांत मिळाली.

पद्धतशीर जीवन जगण्याला सुरुवात जेथे झाली तेथे साहित्यिकांचा समूह आला ! पद्धतशीर जीवन जगण्याचें ज्ञान येणें, पद्धतशीर जीवनाचें सक्रिय तत्त्वज्ञान समजूं लागणें हें ज्याला साधलें तो साहित्यिक मार्गाला लागला !! आचारविचारांतील शुद्धता, संकुचित वृत्तीचा लोप, संघर्षहीनता, परस्पर सहकार्याची ओढ, गरीबाबद्दल प्रेमभावना, समाजोन्नतीच्या कल्पना, याविषयींच्या विचारांची निर्मिति मनांत होणें म्हणजे ग्रामसाहित्य तयार झालें !!!

प्रत्येकाला आपली भावना विश्वव्यापी करावयाची आहे. प्रथम आप्त व नंतर विश्वालाच आपलें घर मानणें किंबहुना हें सारें चराचर विश्व माझेंच स्वरूप आहे ही जीवनाची अत्युच्च कल्पना असून ती साऱ्या समाजांत पसरावयाची आहे. परंतु या उच्चतेला पोचण्यासाठी पायऱ्यांनी जावें लागणार आहे. अनुभव घ्यावे लागणार आहेत. या अनुभवाच्या मार्गाने जातांना जें सामान सामान्यांना गोळा करावयाचें आहे तें त्यांना साहित्यांतूनच मिळायला हवें. साहित्याने तें पुरविलें पाहिजे. तें साहित्य, हें सामान, साहित्यांत आहे. ग्रामीणांत आहे, संतांत आहे, सर्वत्र आहे. सेवाग्रामला अखिल भारतीय कुंभार परिषद झाली. मी कुंभाराच्या सामानांत, मडक्यांतहि साहित्य पाहिलें. मी तेंहि साहित्यच समजतों. जीवनाला सामान देणारें, सामान पुरविणारें, साहित्याचा पुरवठा करणारें तें सारें साहित्य ! कांही साहित्य कलात्मक असेल, कांही कलागुणांत कमी पडेल. पण कलात्मकतेचा अंश कमी असणारें जीवनसाहित्य साहित्यच नव्हे असें म्हणतां

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

येणार नाही. हें साऱ्या जगाचें नाटक प्रतिदिनीं चाललें आहे. हें नाट्यसाहित्य किती विशाल आहे! सारें साहित्य जगाच्या पसाऱ्यांत रंगलें आहे. आपापल्या परीने ह्या साहित्यांतला रंग अनुभवावयाचा आहे. हा अनुभव घेणाऱ्या साहित्यिकांत एखादा परब्रह्माच्या महानंदांत रमून साहित्याच्या पराकोटीला आपल्या साहित्यिक भावना नेवूं शकतो व महान साहित्यिक म्हणून तो अमर ठरतो. त्याची कला, त्याचें साहित्य, अजर, अमर, विश्वात्मक ठरतें.

कुणी म्हणतात, विदर्भ साहित्य सम्मेलनाचें प्रयोजन नाही. कुणाचा विरोध महाराष्ट्र साहित्य परिषद भरवितांना होतो. कुणाला हिंदी साहित्य सम्मेलनाची आवश्यकता नाही असें वाटतें. परंतु ह्या कशाचेंच प्रयोजन नाही असें नाही. प्रांतिक भाषांची किंवा एका राष्ट्रभाषेचीं सम्मेलनें भरावींत असें नसून मी तर म्हणेन की, कुटुंब साहित्याचीं सम्मेलनें भरावींत. ग्राम साहित्याची सम्मेलनें व्हावींत, सर्व भारतीय भाषांचीं एकत्र सम्मेलनें व्हावींत. इतकेंच नव्हे तर विश्व-साहित्य-सम्मेलनाचीहि आवश्यकता आहे असें मला वाटतें.

मला मुंबईला जायचें आहे. मला ठराविक मार्गानेंच जावें लागेल, स्टेशनास्टेशनावर थांबावें लागेल. जीवनाच्या मार्गानेंहि मला समजत समजतच जावें लागेल. गांधीजी नेहमी विश्वदर्शनाचें-आत्मसाक्षात्काराचें धोरण सांगत; पण विश्वदर्शन करतांना शोषण, गुलामी, अपराध, अन्याय, अमानुषता डोळयांनी बघावी हें आत्मसाक्षात्कारी पुरुषाला शोभणार नाही. त्याचें हें कृत्य मूर्खपणाचें आहे. माझ्या विश्वसाक्षात्कारासाठी मला विश्वकल्याणाच्या मार्गानेंच गेलें पाहिजे!

माणसाला मानव करायचें आहे, त्याला दानव व्हावयाचें नाही. महामानव नच झाला तरी चालेल पण माणूस मानव झाला पाहिजे. माणसाला माणूस करायचें आहे, कुणुस नाही. त्याला सर्व जीवनांचें मनोहर हृदयंगम दर्शन घडवायचें आहे. त्यांतलें मांगल्य, त्यांतलें अभिजात सौंदर्य, त्यांतलें सारें वर्म, सारें मर्म, त्याला अनुभवावयाचें, ज्ञान द्यायचें आहे. हें कार्य एक सतीचें वाण आहे. एक दिव्य आहे. हें दिव्य साहित्यिकांनी करायला हवें आहे. हें वाण साहित्यकांनी घ्यायचें आहे.

परंतु बरेच साहित्यिक विकृतीच्या मार्गानें जातात असें खेदाने म्हणावें लागेल.

कला, बुद्धि वा भावना यांचा दुरुपयोग होतो तो होऊं नये. परमाणुस्फोट सुद्धा आम्हाला प्रिय व्हावा पण त्यांच्या सदुपयोगासाठी! अग्नि ओकणारे बॉम्बहि इष्टच, पण सामाजिक विषमतेच्या बेडया टाकून देण्यासाठी त्यांचा उपयोग होईल तर! गुलामीच्या बेडया टाकून आगी लागण्यासाठी ह्या अग्निगोलकांचा उपयोग होईल तर तो बुद्धीचा दुरुपयोग आहे. पोटांतली आग न शमविणारे शास्त्रज्ञांचे अग्निशोध कामाचे नाहीत. विस्तवाचा उपयोग पोटाची भाकरी शिजवायला आहे. बिडी शिलगून कुठेहि जळतें थोटूक फेकून आगी लावणें हा त्याचा उपयोग नव्हे. बिडी फेकणाऱ्याला पर्वा नसते, काळजी नसते व कल्पनाहि नसते. आमच्या साहित्यकांनी आपल्या साहित्याचा दुरुपयोग होणार नाही यासाठी जागरुक असलें पाहिजे. आम्हाला सर्व गोष्टींची गरज आहे. आम्हांला जगांतील नाटकें हवींत, आम्हाला नृत्येंहि हवींत, आम्हाला काव्येंहि हवींत. सारें साहित्य हवें. पण ह्या साऱ्यामुळें मानवी भावना प्रगतीला न्याव्या. ध्येयाचे मार्ग दिसावेत. नाटक पाहून आम्ही नाटकी व्हावें किंवा तमाशा पाहून तमाशेबाज व्हावें आणि विषयांध बनून नातीगोतीं विसरून सैराट धावावें ही नाटक पाहून आमची भावना होऊं नये. कला ही जीवनाची एक पद्धति आहे, मार्ग आहे, रीति आहे, नीति आहे, ह्याचा विसर साहित्याला पडतां कामा नये.

साहित्य झब्बुशाहीची मिरासदारी चालावी ह्यासाठी नाही. भोवतालच्या दीनदुबळयांच्या झोपडया चिरडण्यासाठी साहित्य नाही. जगाला जागवण्यासाठी, जगाच्या निरीक्षणासाठी, जगाच्या विशालतेंत विलीन होण्याचें शिक्षण घेण्यासाठी साहित्य आहे. साहित्यानें भराभर उडया मारत वा अंतराळांतून उडत जायला नको. अशा तकलादू क्षणजीवी साहित्याचें भवितव्य विनाशाकडे वळणारें असतें. असें साहित्य जीवंत राहत नाही. त्याचा उपयोग होत नाही. परिणामकता त्यांत उरत नाही. लढाईंत शंभर वीरांवर वार करीत तुम्ही समोर चाललांत. मागें काय होत आहे इकडे तुमचें

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लक्ष नाही. वस्तुत: तुम्ही पुढें जात आहांत आणि मागचे मरणारे उठून उभे होत आहेत. हें निष्फळ युद्ध आणि परिणाम न करणारी तुमची विनाशी कला एकाच कक्षेंत येतात. वरीलप्रमाणे लढणाऱ्या वीरांची गुलामी जशी नष्ट होत नाही तद्वतच तुमची ही वर-वरची साहित्यनिर्मिति सुद्धा एक गुलामी ठरतेच !

आमच्या समाजांत उत्तम विचार, उत्तम गरजा यांची पूर्तता करावयाची आहे. तळमळ वाटणाऱ्यांनी हें करायला हवें. साहित्यिक त्यांतून सुटत नाही. आचारविचाराचा प्रचार नाही तोंवर देश सुधारायचा विचार व्यर्थ होय ! आमच्या इथल्या शेंकडा शंभर लोकांना तसा धर्म समजतो पण त्यांतली वास्तवता शेंकडा दहांनाहि कळत नाही. सर्प डसला, भीति वाटली, झाला तो आमचा देव. झाड पडलें, झालें झाड देव ! जो आघात करील, जो डंख देईल, जो गचांडी देईल, तो आमचा धर्म होतो. आमच्या धर्मकल्पनांचीच, आमच्या सामाजिक जीवनाची ही अधोगति आहे. ही नष्ट व्हावी असें साहित्यिकांस वाटणार नाही, तर तो साहित्यिक तरी कसला ? संपूर्ण लोकांत मानवता वाढावी, विषमता गाडावी, व अधर्म्यता सोडावी ही धर्माची प्रगति आहे. समाजाची उन्नति आहे. साहित्यिकांचा हातभार यासाठी लागला नाही, तर ते केवळ भुईला भारच आहेत असें म्हणावें लागेल.

आमच्या समाजांतल्या रूढींनीं आमचें जीवन बरबटलें आहे. आंब्याला बहर यावा, त्याप्रमाणे आमच्या बायकांचीं अंगें दागिन्यांनी लदबदलीं असतात. अंगावर जरीकाठी उपरणें घालण्याऱ्याच्या घराबाहेर पन्नास माणसें उष्ट्या पत्रावळी चाटण्यासाठी भांडत असतात. उघडे नागडे अर्धनग्न जीव कुत्र्यापेक्षाहि निपत्तर बनून शितें चाटतात. ज्या देशांत, ज्या प्रांतांत, ज्या गावांत साहित्य संमेलनें भरावींत त्याच गावांतल्या, त्याच प्रांतांतल्या, त्याच देशांतल्या साहित्याला मात्र कुत्र्यापेक्षा निपत्तर जीवन जगणाऱ्या, उष्टीं शितें चाटणाऱ्या दीन दरिद्री भुकेकंगालांची जाणीव नसावी हा दैवदुर्विलासच नव्हे तर काय ? साहित्यानें आता ही जाणीव करून घेतली पाहिजें. त्याशिवाय साहित्याची व्याख्या होवूं शकत नाही. कांहींचें साहित्य दुसरें असूं शकतें. परंतु मला या देशांत तरी तसें साहित्य नको आहे. मला जीवनसाहित्य हवें आहे. समाजांतल्या वैषम्याच्या भिंती, विषम स्थिति निवळणारें साहित्य व तसें साहित्य निर्माण करणारे साहित्यिक मला या देशांत हवे आहेत. हें कार्य कांही कीर्तनाने करतील, कांही भजनांनी करतील, कांही कायद्याने करतील. आम्ही हें कार्य विचारांची पेरणी करून साहित्याच्या माध्यमानें केलें पाहिजें ! साहित्याच्या शक्तीची जाणीव मला आहे. साहित्याची महान् शक्ति जगांतील मोठ्या शक्तींपैकी एक आहे. काव्याने मुर्द्यांच्या मनांतहि चेव येईल. शब्दांत प्राण आहे. त्यांत बाणेदारपणा आहे, तेज आहे, ओज आहे. या शक्तींचा उपयोग माझ्या समाजाला व्हावा. आमच्या देशाचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी ही शक्ति भावनेने वेचली गेली पाहिजे.

समाजाचा विकास कोणत्याहि साधनानें का होईना शीघ्र गतीनें व्हावा ही तळमळ आम्हाला लागली पाहिजे. तमाशांतूनहि ही गोष्ट झाली तरी माझी हरकत नाही. तमाशांच्या सम्मेलनाचें उद्घाटन मीं याच तुमसरांत केलें. प्रथम जवळच्या मुलांनी मला विरोध केला. मीं त्यांना सांगितलें, बुवाच्या नांवाला बळी पडण्यासाठी झाकून झाकून राहण्याची माझी इच्छा नाही आणि झाकटाकीपणां करून मला बुवाबाजीहि करावयाची नाही ! मग मला कुणी संध्या म्हटलें तरी चालेल ! मी गेलों. पांचशें भडवे जमले होते. त्यांत माझा नववा अवतार जाऊन उभा राहिला. मीं भाषणांत सांगितलें, तमाशाची भावनाच न्यारी आहे. मनोरंजनापासून जगाला अलग करतां येत नाही, याची मला जाणीव आहे. परंतु हें मनोरंजन समाजाला विकृत करणारें विद्रुप साधन ठरूं नयें. चांगल्या नाटिका, चांगलीं गाणीं, चांगली कृति घालून तमाशांना कलापथकाचें रूप द्या. यांत तुमचें पोट भरेल व देशाचेंहि भलें होईल. त्यांच्याकडून तसें अभिवचन घेतल्याशिवाय उद्घाटनाची दोरी (लाल टेप) तोडली नाही. जगांतल्या साऱ्याच गोष्टींचा उपयोग करून घ्यायला आम्ही शिकलें पाहिजे. तमाशाच का त्यांतून वगळतां ?

विदर्भ साहित्य सम्मेलनाचे स्वागताध्यक्ष

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गुजराथी–मातृभाषी आहेत. मराठी साहित्य सम्मेलनांत गुजराथीचा हा प्रवेश, ही वस्तुस्थितींतली कल्पनाच मोठी गोड आहे. प्रत्येकाने आपल्या भाषेचें प्रेम ठेवून भारतीयता, विश्वात्मकता, सुद्धा साधावी म्हणूनच मीं सुरवातीला विश्व सम्मेलनाची कल्पना व्यक्त केली. आपण सारे साहित्यिक विश्वाचें साहित्य सम्मेलन घेण्याचें ठरवूं या! अनेक भाषा एकत्र येण्याने वितुष्ट न येतां त्या परस्पर सहकार्याने वाढूं शकतात हें या विश्व–साहित्य–सम्मेलनाच्या कल्पनेनें आपण शिकूं या!

सर्व समाजाला पुढे न्यायला साहित्य आणि त्याचें सम्मेलन हा एक स्तुत्य उपक्रम आहे. या उपक्रमांतून समाजाला जीवनाचें साहित्य, जीवनाचें सामान मिळेल. जीवनाची सेवा मिळेल. सर्व कांही मिळेल अशी विविधांगी दृष्टि साहित्यकांची असावी. जनसंख्येवर कार्याचें मोजमाप होत नाही. कांही थोड्या फार साहित्यिकांनी माझे विचार आत्मसात् केल्यास मला समाधान वाटेल! दुसरीचाहि माणूस आम्ही उचलून धरूं शकतों, हें कृतीनें दाखवून देणारें विदर्भ साहित्य संघाचें हें सम्मेलन आमच्यांतल्या पहिली दुसरीच्या किंवा अंगठे छापाच्या लोकांना साहित्याचा दरवाजा उघडून देऊं चाहतात, हें पाहून मला आनंद होतो. साहित्य हें सर्व समाजाला सामर्थ्य देऊन पुढे नेण्याचें, प्रोत्साहन देण्याचें साधन आहे; तर आमच्या साहित्य संघाचें वा साहित्य सम्मेलनाचें क्षेत्र मूठभरांसाठीच मोकळे न राहतां समाजव्यापी व्हायला हरकत नाही. म्हणूनच मला वाटतें साहित्य संघांत घोंगडेवालेहि आता सदस्य करून घेतले पाहिजेत. साहित्याचे दरवाजे त्यांच्यासाठी बंद न ठेवतां खुले केलें पाहिजेत. त्यांच्याहि साठी साहित्याचे सारे रस्ते मोकळे व्हावेत! **यारे यारे लहान थोर। भलते याती नारी नर॥** ही भावना साहित्य संघाने ठेवून आपल्या क्षेत्राचा विस्तार करायला हवा. तरच तें साहित्य आणि तरच तो साहित्याचा संघ.

विदर्भ साहित्य संघाचीं प्रकाशनें

१. निबंध परिमल	(निवडक मौलिक निबंधांचा संग्रह)	रु. २–४–०
२. सुमन संचय	(कविता संग्रह)	रु. १–४–०
३. मराठी गद्य	(मराठी साहित्यांतील निवडक वेचे)	रु. १–८–०
४. अंमलदार	(नाटक) लेखक–श्री पु. ल. देशपांडे	रु. २–०–०
५. भारती	(नाटक) लेखक–श्री नाना जोग	रु. १–८–०
६. हिंदी मराठी भाषा प्रवेशिका	लेखिका–श्रीमती मालतीबाई श्रीखंडे	रु. ०–१२–०

कै. राम गणेश गडकऱ्यांच्या साहित्यावरील अभ्यासपूर्ण प्रबंध

१. वाग्वैजयंतीचें पुनर्मूल्यन	—डॉ. मा. गो. देशमुख	रु. ०–६–०
२. नाटककार गडकरी	—श्री द. रा. गोमकाळे	रु. ०–६–०
३. गोविंदाग्रज यांचा कवि या नात्याने विचार	–कविभूषण अण्णासाहेब खापर्डे	रु. ०–८–०
४. गडकऱ्यांच्या नाटकांतील स्वगत	—प्रा. श्री. मा. कुळकर्णी	रु. ०–८–०

सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, केन्द्रीय कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर १

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ग्रं थ स मा लो च न

ग्रामीण जीवनावरील एक हृद्य कथासंग्रह

सावली

[लेखक : श्री. ना. रा. शेंडें; प्रकाशक : दि. मा. घुमाळ, नागपूर प्रकाशन, सितावर्डी, नागपूर, मूल्य २॥ रुपये.]

'सावली' हा श्री. ना. रा. शेंडे यांचा पहिलाच कथासंग्रह आहे. प्रस्तुत कथासंग्रहाला श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांची दीर्घ प्रस्तावना आहे. ही प्रस्तावना ग्रंथकाराच्या व्यक्तिमत्वाची ओळख करून देतेच पण ग्रंथकाराच्या वाङ्मयीन प्रकृतीचीहि चर्चा तिच्यांत केलेली आढळते. प्रस्तावनाकारांप्रमाणेच आमचेंहि मत आहे की, श्री. शेंडे हे जानपद जीवनाचीं चित्रें रेखाटण्यांत जास्त कुशल ठरले आहेत. विशिष्ट प्रदेशांतील सत्यकथा यथातथ्यपणें सांगणें वाटतें तितकें सोपें नाही. नागपूर भंडाऱ्याकडील खेड्यांतील जीवन रेखाटतांना श्री. शेंडे यांनी आपलें कलाकौशल्य तर खर्च केलेंच आहे परंतु प्रत्येक कथेंतून ग्रामीण जीवनांतील अनेक सुप्त अंगांवर प्रकाश टाकला आहे. 'सावली' सारखी करुणरम्य प्रणयकथा लिहिणाऱ्या या लेखकाने 'कजलीचें घन' ही नागरजनांना अद्भुत वाटणारी परंतु वस्तुत: ग्रामीण जीवनांत हरघडी घडणारी कथा लिहिलेली आहे. 'भाग्यवान' कथेंत घडलेली घटना स्वत: लेखकाने पाहिलेली आहे. तसें पाहिलें तर या संग्रहांतील कित्येक कथांत वर्णन केलेले प्रसंग लेखकाने स्वत: अनुभवलेले आहेत. ग्रामीण जीवनाचें चित्र रंगवितांना लेखकाने साध्या सरळ निवेदनशैलीने कथा लिहिलेली आहे. कोठेहि कलाकुसरीचा, कृत्रिम रचनेचा प्रयत्न नाही. अनुभवलेली घटना जशीच्या तशी सांगून कथाकार मोकळा होतो. 'भाग्यवान', 'बैलजोडी' या कथांत लेखकाने जशा घटना घडल्या तशा वाचकांना सांगून टाकल्या. स्थानिक वातावरण वर्णन करून कोठेहि कृत्रिमता न आणतां त्याने झालेल्या घटना वर्णन केल्या आहेत. ग्रामीण जनतेची मनोभूमिका लेखकाला पूर्णपणें कळलेली असून तिचें यथातथ्य चित्रण कसें करावें हें तो उत्कृष्टपणें जाणतो, आणि संवेदनशील अंत:करणानें लिहिलेल्या या कथांत भावनांचा आविष्कार सहज सुंदर झालेला आहे. कांही कथांतील करुण प्रसंगामुळें वाचकांचें चित्त हेलावून जातें. 'संकल्प' ही कथा अत्यंत हृदयस्पर्शी आहे. अगदी साध्या सरळ पद्धतीने ही कथा लिहिलेली आहे. परंतु त्या कथेंतील कारुण्य वाचकांचें हृदय हलवून सोडतें. लेखकाला हें जें यश प्राप्त झालें आहे तें स्फोटक भाषाशैलीने नव्हे, अगर विदग्ध कलाचातुरीने नव्हे, तर केवळ एका जिव्हाळ्यामुळे. जीवनाचें अत्यंत जिव्हाळ्याने निरीक्षण केल्यामुळे त्यांच्या कथा हृदयस्पर्शी झाल्या आहेत.

ग्रामीण जीवनाशीं व या दलितवर्गाशीं समरस झालेले फार थोडे लेखक विदर्भांत आहेत. नागपूर—वऱ्हाडकडील जानपद जीवनाचें चित्र रेखाटणारे श्री. शेंडे हेच पहिले कथाकार ठरतील. माडगूळकरांनी जशीं 'माणदेशी माणसें' रंगविलीं तशीं शेंडे यांनी जर इकडील दलितवर्गांतील व्यक्तींचीं चित्रें रेखाटलीं तर तीं खरोखरच सुंदर वठतील. कारण, श्री शेंडे हे जानपद जीवन जगले आहेत. भावनाप्रधान कलावंताच्या हृदयाने त्यांनी अनेक प्रसंग भोगलेले आहेत, अनेक सत्यघटना अवलोकिल्या आहेत. त्यांच्या ठिकाणीं ग्रामीण जीवनाबद्दल जिव्हाळा आहे आणि म्हणूनच कथावाङ्मयांतून त्यांनी ग्रामजीवनाचें दर्शन घडवावें अशी आमची त्यांना विनंती आहे.

'सावली' या कथासंग्रहांत श्री शेंडे यांच्या ललित—लेखनाचे अनेक गुणविशेष प्रगट झालेले आहेत. या पहिल्याच कथासंग्रहाने श्री शेंडे यांनी त्यांच्यासंबंधी मोठ्या अपेक्षा निर्माण केल्या आहेत. त्यांच्या पुढील वाङ्मयीन कृतींची रसिक वाचकवर्ग उत्कंठेने वाट पाहात आहे.

पां. ब. गा.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संमेलन, अधिवेशन १८ वें, तुमसर

संमेलनाच्या खुल्या अधिवेशनांत मंजूर झालेले ठराव

दुखवटा

१. “ विदर्भ साहित्य संघाचे उपकर्ते, तळमळीचे समाजसेवक आणि नागपुरांतील एक प्रमुख कार्यकर्ते श्रीमंत दामोदर विनायक देशमुख, तसेंच विदर्भ साहित्य संघाचे आश्रयदाते श्रीमंत बापूसाहेब चिटणवीस यांच्या आकस्मिक निधनामुळे विदर्भ साहित्य संघाला मनस्वी दुःख झालें. त्यांच्या मृत्यूमुळे विदर्भ साहित्य संघाचें अपरिमित नुकसान झालें आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्रांतील विचारप्रवर्तक ग्रंथकार, तत्वनिष्ठ पत्रकार, सखोल विमर्षक आणि सव्यसाची लेखक व राजकीय तत्वज्ञ आचार्य शंकर दत्तात्रय जावडेकर, नागपूरचे एक निष्ठावंत समाज-सेवक श्री. तात्याजी वझलवार, मुंबई मराठी साहित्य संघाचे तळमळीचे कार्यकर्ते डॉ. अ. ना. भालेराव आणि प्रा. द. सी. पंगु यांच्या दुःखद निधनाबद्दल विदर्भ साहित्य संघाला तीव्र खेद होतो. त्यांच्या निधनामुळे मराठी भाषेचें अत्यंत नुकसान झालें आहे. ही सभा त्यांच्या दुःखद निधनाबद्दल आपलें दुःख व्यक्त करते. त्यांच्या कुटुंबियांवर ओढवलेल्या दुःखांत हें संमेलन सहभागी आहे.

ईश्वर मृतात्म्यांस सद्गति देवो !

डॉ. पेंडसे यांचें अभिनंदन

२. विदर्भ साहित्य संघाचे पूर्वाध्यक्ष, डॉ. शं. दा. पेंडसे यांची पंढरपूर येथे भरणाऱ्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावर निवड झाल्याबद्दल हें संमेलन त्यांचें हार्दिक अभिनंदन करतें.

म. म. प्रा. मिराशी यांचें अभिनंदन

३. मध्यप्रदेशांतील श्रेष्ठ संशोधक व एक जाडे विद्वान, म. म. प्राचार्य वा. वि. मिराशी यांनी अतिशय परिश्रमपूर्वक लिहिलेल्या “ भारतीय उत्कीर्ण लेखसंग्रह ” या मालेंतील “कलचुरी –चेदि संवतांतील उत्कीर्ण लेख ” (Corpus Inscriptionum Indicarum Vol. 4 “ Inscriptions of the Kalachuri-Chedi Era ”) या मूल्यवान ग्रंथाचें प्रकाशन झाल्याबद्दल हें संमेलन त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करतें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

श्री तुकडोजी महाराजांचें अभिनंदन

४. सर्वसामान्य जनतेला अत्यंत उपयुक्त असा 'ग्रामगीता' हा ग्रंथ राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांनी लिहून जें लोकसेवेचें अभिमानास्पद कार्य केलें त्याबद्दल हें संमेलन अंतःकरण-पूर्वक अभिनंदन करतें.

लोकमान्यांचा शतसांवत्सरिक जयन्त्युत्सव

५. १९५६ सालच्या जुलै महिन्यांत लोकमान्य टिळकांचा शतसांवत्सरिक जयंत्युत्सव भारतभर मोठ्या प्रमाणावर साजरा होणार आहे. हा उत्सव विदर्भ साहित्य संघातर्फे लोकमान्यांच्या नांवाप्रमाणे साजरा करण्यांत यावा व विदर्भ साहित्य संघाच्या शाखांतर्फेहि ठिकठिकाणीं हा उत्सव साजरा करण्यांत यावा.

राजपत्रांत ग्रंथांची सूचि प्रसिद्ध करावी

६. मध्यप्रदेशांत प्रसिद्ध होणाऱ्या ग्रंथांची सूचि शासनातर्फे पूर्वी राजपत्रांत प्रसिद्ध होत असे. ती अलीकडे बंद करण्यांत आली आहे असें दिसतें. ती पुन्हा सुरू करण्यांत यावी. प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक पुस्तकाच्या तीन प्रती शासनाकडे जातात, त्यांपैकी निदान मराठी भाषेंत प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांची एक एक प्रत शासनाने विदर्भ साहित्य संघाला द्यावी. तसेंच भारतांतील सर्व मराठी पुस्तक लेखकांनी व प्रकाशकांनी आपण लिहिलेल्या व प्रकाशित केलेल्या पुस्तकांची एक प्रत विदर्भ साहित्य संघाकडे पाठवावी, अशी त्यांना विनंती आहे. विदर्भ साहित्य संघाने प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांची यावत्शक्य संपूर्ण यादी दरवर्षी प्रसिद्ध करावी.

मराठी भाषिक मुलुख मराठी प्रदेशाला जोडा

७. राज्य पुनर्रचना मंडळाने नवीन प्रदेशांची शिफारस करतांना मध्यप्रदेशांतील हिंदी जिल्ह्यांतील मराठी तालुक्यांचा विचार केलेला नाही, या गोष्टीची हें संमेलन नोंद घेत असून बऱ्हाणपूर, भैसदेही, मुलताई, संसर व वाराशिवनी हे तालुके आणि बालाघाट जिल्ह्यांतील लांजी रेव्हेन्यू सर्कल हें पूर्णतः मराठी भाषी असल्यामुळे ते मराठी प्रदेशाला जोडणें आवश्यक आहे व त्याप्रमाणे मराठी प्रदेशाच्या सीमेंत आवश्यक बदल करून वरील तालुके मराठी प्रदेशांत घालण्यांत यावेत.

साहित्य संस्थांत एकसूत्रीपणा

८. महाराष्ट्र साहित्य परिषदेने अखिल महाराष्ट्रांतील साहित्य संस्थांत एकसूत्रीपणा आणण्याबाबत पुन्हा नव्याने जो प्रयत्न सुरू केला आहे त्याबद्दल विदर्भ साहित्य संघाला आनंद वाटतो. विदर्भ साहित्य संघाने याबाबत सन १९५१ सालीं जो ठराव केला होता तो हें एकसूत्रीकरण घडवून आणण्याला आजहि पुरेसा आहे, असें या संमेलनाचें मत आहे. त्या ठरावांत आवश्यक ती व्यावहारिक दुरुस्ती करून हें संमेलन एकसूत्रीकरणाच्या योजनेस पूर्ण पाठिंबा देत आहे. दुरुस्त ठराव येणेंप्रमाणे—

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

" महाराष्ट्रांतील साहित्य संस्थांत एकसूत्रीपणा आणणारी महाराष्ट्र साहित्य परिषद ही केवळ संघायक (Federal) स्वरूपाची संस्था बनावी. या संघायक संस्थेचे घटक येणेंप्रमाणे असावेत—

(अ) प्रादेशिक (विविध राज्यांतर्गत मराठी भाषी विभागांत) कार्य करणारे संघ (उदाहरणार्थ–विदर्भ साहित्य संघ, मराठवाडा साहित्य परिषद, गोमंतक साहित्य परिषद इत्यादि.)

(आ) स्थानिक (संकल्पित संयुक्त महाराष्ट्राच्या मर्यादेपलीकडील) नगर निहाय संस्था (उदाहरणार्थ— दिल्ली, इंदूर, ग्वाल्हेर, बडोदें, जबलपूर इत्यादि शहरांतील मराठी साहित्य संस्था.)

अथवा

महाराष्ट्र साहित्य परिषद ही संस्था संघायक बनवावयाची नसल्यास तिला प्रादेशिक घटक बनवावें लागेल आणि संघायक संस्थेला ' मराठी साहित्य महामंडळ ' अशा प्रकारचें नांव द्यावें लागेल.

सभासदत्व—संघायक संस्थेचें सभासदत्व घटकनिहाय असावें; व्यक्तिनिहाय नसावें. उदाहरणार्थ--महाराष्ट्र साहित्य परिषदेचे सांप्रतचे सभासद हे (अ) वा (आ) या घटकाचे सभासद मानले जातील आणि घटकांनी पाठविलेले प्रतिनिधि हे संघायक संस्थेचे सर्वसाधारण सभासद होऊन कार्यकारी मंडळ बनवितील.

स्वायत्तता—वर दिलेल्या कोणत्याहि पर्यायानुसार अथवा त्यांत सर्वमान्य दुरुस्त्या करून एकसूत्रीकरणाची जी योजना तयार होईल व जी सांघिक घटना आकारास येईल तींत प्रादेशिक वा स्थानिक संस्थांच्या स्वायत्ततेला बाध येईल असें कांही असूं नये. सांघिक संस्थेचे ठराव हे शिफारशींच्या स्वरूपाचे मांडण्यांत यावेत आणि प्रादेशिक वा स्थानिक संस्थांच्या ज्या घटना अस्तित्वांत आहेत व त्यामुळे जे अधिकार व जबाबदाऱ्या त्यांनी स्वीकृत केल्या आहेत त्यांना कोणत्याहि प्रकारें बाध येईल असें नव्या सांघिक घटनेंत कांहीहि घालण्यांत येऊं नये.

विदर्भाच्या बोलींचें संशोधन

९. विदर्भांत ज्या अनेक बोली आहेत त्या बोलींची सूचि, त्यांची माहिती व त्यासंबंधीचें संशोधन, याविषयीं अभ्यासपूर्ण ग्रंथ तयार होणें अवश्य आहे. विदर्भ साहित्य संघाने या कार्यांत पुढाकार घ्यावा व या विषयांवरील संशोधन करणाऱ्या विद्वानांच्या सहकार्याने या ग्रंथनिर्मितीची तयारी करण्यास आरंभ करावा. केंद्रीय कार्यालयाच्या व अभ्यासकांच्या सहकार्याने हें कार्य पूर्ण करण्यासाठी पुढील सभासदांची एक समिति नेमण्यांत यावी.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ· परीक्षा समिति, नागपूर

सात्रिक प्रतिवृत्त

गेल्या तीन वर्षांत परीक्षा समितीने आपल्या क्षेत्रांत प्रचार दृष्ट्या नवे नवे प्रयोग केलेत. त्याचें फल आज सर्वांना ज्ञात आहे. पहिल्या वर्षी अंदाजपत्रकांत तरतूद नसल्यामुळे केवळ कारभार लक्ष्यांत आणून जमाखर्चाची जेमतेम तोंड मिळवणी करण्यांतच परीक्षा समितीची बरीच शक्ति खर्च झाली. दुसऱ्या वर्षांत परीक्षा समितीने दोन गोष्टी नव्याने केल्यात. त्यांपैकी पहिली म्हणजे केंद्रांना पाठ्य-ग्रंथांचें अनुदान आणि दुसरी म्हणजे निरीक्षकांना प्रति बैठक एक रुपया पुरस्कार. तिसऱ्या म्हणजे वर्तमान वर्षी त्याहि पलीकडे मजल जाऊन तीन गोष्टी करण्यांत आल्यात. (१) प्रत्येक केंद्राधिकाऱ्यांना १५ प्रतिशत (परीक्षा शुल्काच्या) केन्द्र पुरस्कार. (२) युगवाणीचें अनुदान. (३) पुढील वर्षाकरिता सक्रिय प्रचारक पुरस्काराची योजना. याहिपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे जिल्हा समित्यांची स्थापना पुढीलप्रमाणे करण्यांत आली आहे.

(१) नागपूर जिल्हा समिति—	संगठक—	प्रा. माणिक के. वैतुले.
(२) भंडारा		श्री. व. बा. शब्दे.
(३) अमरावती ,,		,, द. शं. फडके.
(४) वर्धा		,, रा. वि. करपे.
(५) चांदा ,,		,, तु. ना. काटकर.
(६) सागर		प्रा. दा. ल. अडोणी.
(७) जबलपूर		प्रा. गो. मो. रानडे.

फलत: आज जवळ जवळ शंभर केंद्रें आणि ३५१२ विद्यार्थी [केवळ जानेवारी २२५०] ५० प्रचारक; २५ अध्ययन केन्द्रें, अशी प्रगति आपणास आढळून येईल.

परीक्षा समितीची पहिली कारकीर्द प्रा. बनहट्टी साहेबांची असून दुसरी प्रा. डॉ. कोलते साहेबांची होती. उभयतांनी परीक्षा समितीला जें अधिष्ठान मिळवून दिलें, त्यावर प्रा. श्री. पां. कृ. सावळापूरकर यांच्या कुशल व सहानुभूतिपूर्ण नेतृत्वामुळे गेल्या तीन वर्षांत विद्यमान कार्यवाहाला परीक्षा समितीचें

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पुष्कळच कार्य पुढे रेटतां आलें. याबद्दल तिन्ही संचालकांचे जेवढे आभार मानावेत तेवढे थोडेच आहेत. परंतु त्याबरोबर वि. सा. संघाने म. सा. परिषदेप्रमाणे परीक्षा घ्याव्यात अशी कल्पना अगदी आरंभीं काढणारे श्री. रा. पु. सगदेव यांचाहि येथे उल्लेख करणें कर्तव्य वाटतें.

परीक्षा समितीचा प्रगतिपट

(तीन वर्षांपूर्वी)

सत्र	प्रवेश	प्रारंभ	विनीत	परिचित	स्नातक	पारंगत	एकूण	केन्द्रें
आगस्ट ५२	१०	८८	२००	४५	१५	६	३६४	१५
जानेवारी ५३	५३	१३०	३०७	७४	५४		६१८	२५

गेलीं तीन वर्षें—

	सत्र—	प्रवेश	प्रारंभ	विनीत	परिचित	स्नातक	पारंगत	एकूण परी.	केंद्रें
१	आगस्ट ५३	२१	११५	३३४	५१	३२	२	५५५	२६
	जानेवारी ५४	७१	२९२	६४७	७२	४२	९	११३३	३९
२	आगस्ट ५४	९२	२३०	५९०	६३	६५	×	१०४०	४२
	जानेवारी ५५	१३०	४३५	६७५	१२०	४३	९	१४१२	४७
३	आगस्ट ५५	७८	३५२	६१३	१६३	५८	×	१२६२	५१
	जानेवारी ५६	१३२	६१३	११४०	२२०	१२४	२१	२२५०	६२

प्रस्तुत सर्व कार्यांत गतवर्षी आणखी एका नव्या परीक्षेची भर पडली असून डॉ. पेंडसे, डॉ. कोलते व डॉ. देशमुख यांच्यासह संचालक व कार्यवाहांची आचार्य प्रबंध परीक्षा समिति स्थापन होऊन पीएच. डी. समकक्ष परीक्षा सुरू करण्यांत आली व एकूण चार विषयांपैकी दोन विषयांना मान्यताहि देण्यांत आली. परीक्षा समितीचें कार्य महाराष्ट्र, मराठवाडा आदि ठिकाणींहि सुरू होऊन दिल्लीपर्यंतहि पोचण्याचें भाग्य परीक्षा समितीला लाभलें आहे. महाराष्ट्र साहित्य परिषद व राष्ट्रभाषा प्रचार समिति यांनी परीक्षा समितीच्या परीक्षांना मान्य केलें आहे. सरकारी मान्यता पूर्वीच होती. तींत सरकारी वर्ग व परीक्षा केंद्र सुरू होऊन नवी भर पडली. कै. ना. कृ. दिवाणजी पारितोषकांत डॉ. शिणापूरकर स्वर्ण पदकाची भर पडून [५०० रुपयांच्या उदार देणगीनें] परीक्षा समितीच्या उत्कर्षास मदतच झाली आहे. राज्यपुनर्घटनेच्या नव्या आंदोलनामुळे अहिंदी क्षेत्रांत प्रचार कार्याला बाधा उत्पन्न झाली. अन्यथा ती बाजूहि ठळकपणें लक्षांत आणण्यासारखें घडलें असतें. परीक्षा समिति—संचालक–प्रा. श्री. पां. कृ. सावळापूरकर, कार्यवाह—प्रा. माणिक के. वेतुले. सभासद—प्रा. श्री. या. मु. पाठक; गो. मो. रानडे; श्री. द. शं. फडके; श्री. दि. ब. पंडित; प्रा. श्री. दा. ल. अलोणी; सौ. उषाताई कोलते; श्री. रा. पु. सगदेव; श्रीमती शकुंतलाबाई दिवाणजी; श्री. व. बा. शब्दे; श्री. तु. ना. कांटकर; श्री. रा. वि. करपे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वरील सदस्यांनी व अन्य हितचिंतकांनी अनेक रीतीने अमूल्य साह्य केलें. अध्यक्ष, उपाध्यक्ष, कोषाध्यक्ष व सरचिटणीस याहि लोकांनी समितीला वारंवार आवश्यक साह्य केलें.

कार्यालय

गेलीं दोन वर्षे परीक्षा समितीचें कार्यालय श्री. कार्यवाहांच्या निवासस्थानीं होतें. आणि पहिल्या वर्षी समितीला कोणत्याहि लिपिकाची व सेवकाची मदत नव्हती. गतवर्षी केवळ तीन तासांकरिता एका लिपिकाची मदत मिळत होती. आणि या वर्षी १० एप्रिल पासून विदर्भ साहित्य मंदिरातील एक खोली मिळाली आणि तीन अल्पकालीन लिपिक व दोन अल्पकालीन सेवक मिळून या वर्षी समितीच्या कार्यालयाची उभारणी झाली. गेलीं दोन वर्षे श्री. तु. व. वोडखे यांनी समितीला केवळ भावाने अमोल साह्य केलें. आणि चालू वर्षी संपूर्ण कार्यालयाची अत्यंत चोख व्यवस्था ठेवून समितीला उपकृत केलें आहे.

निःशुल्क निर्वेतन वर्गव्यवस्था—गेलीं दोन वर्षे परीक्षा समितीच्या वतीने वर्ग चालविले जात असून यावर्षी सा. पारंगत या सर्वोच्च उपाधि परीक्षेचेहि वर्ग घेतले गेले आहेत. याचें श्रेय प्रा. पां. कृ. सावळापूरकर, प्रा. परांजपे, प्रा. कोलते, प्रा. पाठक, प्रा. डोळके, प्रा. बैतुले, प्रा. वऱ्हाडपांडे सर्वश्री घाटोळे, येगावकर, धामोरीकर, वोडखे, जामदार, कर्वे, इत्यादि अनेक बर्डीविभागस्थित व भारतीय भाषाध्ययन मंदिराच्या अध्यापक-प्राध्यापकांनी आपलें अमूल्य निर्वेतन अध्यापन साह्य देवून समितीला उपकृत केलें. याबद्दल सर्वांचो समिति ऋणी आहे.

आजतागायत सुमारें शंभर परीक्षकांनी समितीला अत्यंत अल्प मानद्रव्य घेऊन परीक्षण साह्य करून उपकृत केलें आहे. त्यांचीहि समिति ऋणी आहे.

(प्रा.) माणिक के. बैतुले
कार्यवाह परीक्षा समिति, वि. सा. संघ

विदर्भ साहित्य संघ : गडकरी स्मारक समिति

गडकरी स्मृतिदिन समारंभ १९५६

निबंधस्पर्धेचा निकाल

क्रमांक १ : श्री. आनंदराव फुले, नागपूर

क्रमांक २ : कु. सिंधू पुरणकर, शिक्षिका, महाराष्ट्र विद्यालय, नागपूर

क्रमांक ३ : वि. दे. जोशी, बिंझाणी नगर विद्यालय, नागपूर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

सं घ वा र्ता

ल. वा. पांढरीपांडे,
सरचिटणीस, वि. सा. संघ
यांजकडून

केंद्रवृत्त नागपूर,

विदर्भ साहित्य संमेलनाचें तुमसर येथील १८ वें अधिवेशन

अभूतपूर्व पूर्वतयारी

विदर्भ साहित्य संमेलनाचें १८ वें वार्षिक अधिवेशन, तुमसर (जि. भंडारा, म. प्र.) येथे मध्यप्रदेशाचे माजी शिक्षण मंत्री, बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली डिसेंबर १९५९ च्या २४ आणि २५ तारखांना भरलें. संमेलनासाठी टिळक राष्ट्रीय शाळेच्या विस्तृत पटांगणांत भव्य शामियाना उभारला होता; सर्वत्र विद्युद्दीपांची मनोहारी आरास करण्यांत आली होती. संमेलन स्थळाचें तें दृश्य मोठें विलोभनीय होतें.

पुराणवस्तुसंग्रह व विद्यार्थ्यांच्या हस्तकौशल्याचें प्रदर्शन

संमेलनाच्या निमित्ताने राष्ट्रीय शाळेंतील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध व्यवहारोपयोगी, चित्रें व हस्तकला यांचें छोटेसें पण सुंदर प्रदर्शन आयोजित करण्यांत आलें होतें. मध्यप्रदेश संशोधन मंडळातर्फे श्री दे. गो. लांडगे यांनी पुराणवस्तु संग्रह आणि संशोधनात्मक लेखांची श्रमपूर्वक उत्तम मांडणी केली होती.

वि. सा. संघाच्या कार्यकारी मंडळाची सभा

वि. सा. संघाच्या कार्यकारी मंडळाची सभा टिळक राष्ट्रीय शाळेच्या दिवाणखान्यांत दि. २४-१२-५९ रोजीं सकाळीं ९-३० वाजतां, संघाध्यक्ष श्रीमान् बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली भरली.

१. प्रथम सरचिटणिसांनी दि. १८-१२-५९ च्या कार्यकारी मंडळाच्या सभेचा अहवाल वाचून दाखविला व तांत्रिक दुरुस्त्यांसह तो सर्वानुमतें मंजूर झाला.

२. संघशाखा घटना उपसमितीने सुचविलेल्या शाखांबाबतच्या घटनात्मक दुरुस्त्या व आमंत्रकांचा अहवाल ह्यांवर साधकबाधक चर्चा होऊन या दुरुस्त्या घटनात्मक असल्याने त्यांचा येत्या सर्वसाधारण सभेंत विचार होणार नाही म्हणून आमंत्रकांनी संघशाखा घटना उपसमिति आणि घटनासमिति यांची एक संयुक्त सभा येत्या विशेष साधारण सभेपूर्वी बोलावून ह्या सूचनांचा विचार करावा असें सर्वानुमतें ठरलें.

शेवटीं संमेलनासाठी आलेले ठराव सादर करण्यांत आले व दि. १८-१२-५९ च्या सभेंत

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मंडळाने ठरविल्यानुसार भाषिक तत्त्वावरील ठराव ह्या संमेलनांत येऊं नयेत असें सर्वानुमतें कार्यकारी ठरल्यावर सभेचें काम संपलें.

संमेलन प्रसंगींची सर्वसाधारण सभा

विदर्भ साहित्य संघाच्या सभासदांची सर्वसाधारण सभा शनिवार दि. २४-१२-९९ रोजीं सकाळीं दहा वाजतां टिळक राष्ट्रीय शाळेच्या दिवाणखान्यांत, संघाध्यक्ष श्रीमान् बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली भरली.

१. सरचिटणिसांनी दि. २४-४-९९ रोजीं भरलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा अहवाल वाचून दाखविला व तो मंजूर झाला.

२. १९९६-९७ सालच्या निवडणुकींसाठी लवादाच्या नेमणुकीचा प्रश्न सभेपुढे आला. श्री बाबासाहेब ढवळे यांनी श्री खं. के. रांगोळे यांचें नांव सुचविलें आणि श्री तु. ना. काटकर यांनी त्याला अनुमोदन दिलें. दुसरें नांव पुढे न आल्याने घटना नियम १२ (अ) प्रमाणे १९९६–९७ च्या निवडणुकींबाबत आलेल्या तक्रारींचा विचार करून निकाल देण्यासाठी श्री खं. के. रांगोळे लवाद म्हणून अविरोध एकमताने निवडून आले.

त्यानंतर सभेचें काम संपलें.

विषय नियामक समितीची सभा

वरील सर्वसाधारण सभेचेंच विषय नियामक समितींत रूपांतर करण्यांत यावें असें अध्यक्षांनी जाहीर केल्यावर लगेच त्याच ठिकाणीं सकाळीं अकरा वाजतां ही सभा भरली.

सभेंत संमेलनाला आलेल्या ठरावांवर साधकबाधक चर्चा होऊन नऊ ठराव संमत झाले व ते खुल्या अधिवेशनांत एकमताने मंजूर झाले. मंजूर झालेले ठराव अन्यत्र दिलेले आहेतच.

प्रारंभ

शनिवार दि. २४-१२-९९ रोजीं सायंकाळीं अधिवेशनाच्या प्रमुख कार्यक्रमाला सुरुवात झाली. स्वागताध्यक्ष श्रीमान् मनोहरभाई पटेल यांच्या समवेत संमेलनाध्यक्ष श्रीमान् बाबासाहेब खापर्डे यांनी व्यासपीठावर प्रवेश करतांच सर्वांनी त्यांना अभिवादन केलें. माननीय अध्यक्षांच्या समवेत उद्घाटक राष्ट्रसंत श्री. तुकडोजी महाराज, स्वागताध्यक्ष श्रीमंत मनोहरभाई पटेल, वि. सा. संघाचे विश्वस्त न्या. मू. अण्णासाहेब मंगळमूर्ति आणि वि. सा. संघाचे पूर्वाध्यक्ष डॉ. य. खु. देशपांडे, श्री. पु. य. देशपांडे, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, डॉ. मा. गो. देशमुख, डॉ. वि. भि. कोलते, प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे, तसेंच म. म. प्रि. वा. वि. मिराशी, श्री. बाळासाहेब ढवळे, प्रभृति मंडळी व्यासपीठावर विराजमान झालीं होतीं. या प्रसंगीं मध्यप्रदेशांतील अनेक नामवंत साहित्यिक, संशोधक, कवि, पत्रकार आणि तुमसरचे सेठ दुर्गाप्रसाद, सेठ गोपीकिसनजी अग्रवाल, सेठ घासीलाल जयपुरिया प्रभृति धनिक, जिल्हाधिकारी श्री. आवळे, डी. एस. पी. व अधिकारी वर्ग, कार्याध्यक्ष श्री. आ. म. माकडे गुरुजी, कर्मवीर बापूजी पाठक,

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

श्री. हर्देनिया, श्री. काटे, श्री. लांजेवार आणि वि. सा. संघाच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य व नागपूर, अमरावती, गोंदिया, भंडारा, रामटेक, चांदा, हिंगणघाट, खामगांव वगैरे वि. सा. संघ शाखांचे दूरदूरच्या ठिकाणाहून आलेले प्रतिनिधि आणि तुमसरस्थ प्रतिष्ठित नागरिक स्त्री पुरुषांनी सभामंडप फुलून गेला होता.

स्वागत गीत आणि महाराष्ट्र गीत

स्वागतपर मधुर गीताने संमेलनाला प्रारंभ झाला; आणि सौ. शालिनी शास्त्री यांनी आपल्या सुस्वर आवाजात गायिलेल्या महाराष्ट्र गीताने उपस्थितांचीं मनें पुलकित केली.

स्वागताध्यक्षांचें भाषण

त्यानंतर स्वागताध्यक्ष श्री. मनोहरभाई पटेल यांनी संमेलनाचे उद्घाटक राष्ट्रसंत श्री. तुकडोजी महाराज यांना पुष्पहार घालून उद्घाटनाची विनंती केली. स्वागताध्यक्षांनी आपल्या मराठी भाषणांत विदर्भ साहित्य संघाच्या उदार धोरणाचा गौरव करून अध्यक्षांचें स्वागत केलें. (हें भाषण युगवाणीच्या डिसेंबर १९५५ च्या अंकांत विस्ताराने दिलेलें आहे.)

राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांचा आशीर्वाद

संमेलनाचे उद्घाटक राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांनी आपल्या व्हानशा पण भावपूर्ण भाषणाने अधिवेशनाचें उद्घाटन केलें. ते म्हणाले, " जनतेनेच मला साहित्याचा अर्थ शिकविला. माणसाला मोठें करण्याचें सामर्थ्य साहित्यांत आहे आणि म्हणून अशा साहित्याचा लाभ साहित्यिकांनी जनतेला करून दिला पाहिजे. सामाजिक विषमता नष्ट करण्याच्या साहित्याच्या शक्तींत खरें काव्य आहे आणि मी साहित्यिक नसतांनाहि माझा जो येथे हा बहुमान आपण करीत आहांत त्यावरून थेट सामान्य मनुष्यापर्यंत साहित्य नेण्याची प्रेरणा या संमेलनाने दिली आहे असें मला वाटतें. साहित्यद्वारा मातृभूमीची सेवा करण्यासाठी आपल्याला आता एक भारतीय संमेलन भरवावें लागेल."

त्यानंतर विदर्भ साहित्य संघाचे चिटणीस श्री. वसंत बाळाजी शब्दे यांनी संमेलनाला आलेले खालील व्यक्तींचे व संस्थांचे शुभसंदेश वाचून दाखविले. लोकसभेचे अध्यक्ष श्री. ग. वा. मावळंकर, लोकसभा सदस्य श्री. न. वि. उर्फ काकासाहेब गाडगीळ, मध्यप्रदेशाचे कल्याण मंत्री श्री. दीनदयाल गुप्ता, महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. वि. स. खांडेकर, कोल्हापूर; महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे चिटणीस श्री. वा. दा. गोखले, पुणें; महाराष्ट्र साहित्यसभा, इंदूर तर्फे चिटणीस श्री. जहागिरदार; इंडियन नॅशनल लायब्ररीचे उपग्रंथपाल श्री. यां. मु. मुळे, कलकत्ता; किर्लोस्कर मासिकांचे संपादक श्री. शं. वा. किर्लोस्कर; 'उदय'चे संपादक श्री. ना. रा. बामणगांवकर, अमरावती; कविभूषण अण्णासाहेब खापर्डे, अमरावती; श्री. मा. गो. काटकर, सोलापूर; कवि आनंदराव टेकाडे, नागपूर; वसंत मासिकाचे संपादक श्री दत्तप्रसन्न काटदरे, मुंबई; मीमांसाभूषण प्रा. पु. बा. साठे, आर्वी;

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

श्री. ना. ग. डबीर; गोंदिया; श्री. नानासाहेब हार्डीकर, भंडारा; श्री. कुळकर्णी, नागपूर; प्रा. माणिक के बैतुले नागपूर; श्री. र. वि. कुळकर्णी, नागपूर; 'सुषमा' मासिकाचे संपादक श्री. कुंडलराय मोहेकर, नागपूर; श्री. त्रि. गो. देशमुख, नागपूर इत्यादि.

संमेलनाध्यक्षपदाची सूचना

यानंतर अध्यक्षपदासाठी श्रीमान् बाबासाहेब खापर्डे यांचें नांव भंडारा जिल्ह्यातर्फे श्री. वसंत बाळाजी शब्दे यांनी सुचविलें. नागपूर तर्फे म. म. वा. वि. मिराशी; चांद्यातर्फे श्री. तु. ना. काटकर, खामगांवतर्फे प्रा. प्र. वा. ऊर्ध्वरेषे; अकोल्यातर्फे प्रा. श्री. गो. काशीकर; गोंदियातर्फे श्रीमान् छोटुसाभाई क्षत्रीय आणि अमरावतीतर्फे प्रा. कृ. व्यं. पेशकार या कार्यकर्त्यांनी अध्यक्षांच्या गुणगौरवपर भाषणें करून सूचनेस दुजोरा दिला. श्रीमान् बाबासाहेबांनी अध्यक्षस्थान ग्रहण केल्यावर स्वागताध्यक्षांनी पुष्पमाला घालून त्यांचें स्वागत केल्यावर, विदर्भ साहित्य संघाच्या भंडारा, गोंदिया, तुमसर, हिंगणघाट, खामगांव, अमरावती आणि चांदा येथील शाखा, गुरुदेव सेवा मंडळ मोझरी, आणि स्थानिक संस्थांनी त्यांना पुष्पमाला समर्पण करून त्यांचें थाटानें स्वागत केलें.

श्रीमान् बाबासाहेब खापर्डे यांचें अध्यक्षीय भाषण

त्यानंतर संमेलनाध्यक्ष श्रीमान् बाबासाहेब खापर्डे, यांचें अत्यंत अभ्यासपूर्ण आणि मननीय अध्यक्षीय भाषण झालें. त्यांनी आपल्या रोचक भाषणांत हल्लीचें वाङ्मय कसें आहे; वाङ्मय निर्मिति करतांना आजच्या साहित्यिकानें साहित्य हें समाजजीवनावर खोल परिणाम करणारें आहे हें लक्षांत ठेऊन तत्त्वनिष्ठ लिखाण करणें अधिक श्रेयस्कर आहे ह्यावर सोदाहरण विस्तृत निवेदन करून पाश्चात्यांच्या संपर्कानें आमच्यांत शिरलेल्या एकांगी लिखाण, रूढ कल्पनांचा उपमर्द, एकेरी प्रयोग इत्यादि अवगुणांपासून शक्य तों दूर राहण्याबाबत आपले विचार मांडले. (हें भाषण युगवाणीच्या डिसेंबर १९६९ च्या अंकांत समग्र प्रसिद्ध झालेलेंच आहे.)

अंमलदार

रात्रीं १० वाजतां करमणुकीसाठी नाटयप्रयोगाचें आयोजन करण्यांत आलें होतें. नागपूर येथील 'नागपूर नाटय मंडळ' या संस्थेनें श्री. पु. ल. देशपांडेकृत "अंमलदार" ह्या अत्यंत विनोदी नाटकाचा हातखंडा प्रयोग करून दाखविला. नाटक फारच बहारदार वठलें.

परिसंवाद

दुसरे दिवशीं रविवार दि. २९-१२-६९ रोजीं सकाळीं ८-३० वाजता साहित्यिकांच्या परिसंवादानें संमेलनाच्या कार्यक्रमास सुरुवात झाली. परिसंवादांत प्रा. भ. श्री. पंडित यांचें "काव्य" या विषयावर, श्री. द. रा. गोमकाळे यांचें नाटयावर; प्रा. पां. कृ. सावळापूरकर यांचें "संशोधन" या विषयावर, कथा-कादंबरीवर प्रा. सौ. कुसुमावती देशपांडे यांचें, टीकावाङ्मयावर प्रा. प्र. वा. ऊर्ध्वरेषे यांचें आणि श्री. दि. ब. पंडित यांचें "गद्य" या विषयावर, अशीं साहित्यांतील निरनिराळ्या सहा विषयांवर अत्यंत उद्बोधक भाषणें झालीं.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

काव्यगायन

त्यानंतर लगेच श्री. ना. रा. शेंडे यांच्या अध्यक्षतेखाली काव्यगायनाचा सुंदर कार्यक्रम झाला. प्रा. म. श्री. पंडित, श्री. मा. नी. गलगलीकर, सौ. उषा लिमये, श्री. बा. रा. कान्त, श्री. बाबा मोहोड, श्री वसंत निनावे आणि प्रा. या. मु. पाठक प्रभृति कवि--कवयित्रींनी आपापल्या भावपूर्ण व अर्थपूर्ण कविता सादर केल्या. शेवटीं राष्ट्रसंत श्री. तुकडोजी महाराज यांनी आपलें एक भजन गाऊन या कविसंमेलनास शोभा आणली.

साहित्यिकांची सहल

स्वागत मंडळाने संमेलनाला आलेल्या पाहुण्यांसाठी तुमसरच्या परिसरांतील प्रेक्षणीय स्थळांपैकी प्रसिद्ध असलेली मॅंगनीजची खाण दाखविण्याची खास सोय केली होती. भोजनोत्तर दोन मोठ्या मोटारी खाणींवर जाण्यास सुसज्ज उभ्या होत्या. जवळ जवळ १०० प्रतिनिधींनी या खाणीला भेट दिली.

"ग्रामगीतेचें प्रकाशन"

सायंकाळीं साडेचार वाजतां राष्ट्रसंत श्री. तुकडोजी महाराज यांनी लिहिलेल्या "ग्रामगीता" या मौलिक ग्रंथाचें प्रकाशन महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. शं. दा. पेंडसे यांच्या हस्तें झालें. याप्रसंगीं या ओवीबद्ध ग्रंथराजाच्या गौरवपर श्री. बाबासाहेब खापर्डे, प्रा. श्री. ना. बनहट्टी, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, आणि श्री. पु. य. देशपांडे यांचीं भाषणें झाल्यावर डॉ. शं. दा. पेंडसे यांनी या ग्रामगीतेचा प्रसार घरोघर व्हावा अशी इच्छा प्रदर्शित करणारें भाषण केलें. शेवटीं महाराजांच्या रसाळ वाणींतून भारताचें जनगान होऊन हा भारदस्त कार्यक्रम आटोपला.

साहित्यग्रणींचा थाटाचा सत्कार

यानंतर लगेच साहित्यक्षेत्रांतील अनुभवी व ज्येष्ठ साहित्यिकांचा सन्मान करण्यांत आला. राष्ट्रसंत श्री. तुकडोजी महाराज; म. म. आचार्य वा. वि. मिराशी; डॉ. य. खु देशपांडे; डॉ. शं. दा. पेंडसे; प्रा. श्री. ना. बनहट्टी आणि श्री. ए. श्री. पटवर्धन या सहा विद्वद्रत्नांना कार्याध्यक्ष श्री. माकडे गुरुजी यांच्या हस्तें प्रत्येकीं शाल व श्रीफल अर्पण करण्यांत आलें. या साहित्यिकांच्या गौरवार्थ अनुक्रमें श्रीमान बाबासाहेब खापर्डे; डॉ. शं. दा. पेंडसे; श्री. दे. गो. लांडगे; श्री ग. त्र्यं. माडखोलकर; श्री. द. रा. गोमकाळे आणि श्री. पु. य. देशपांडे यांचीं अतिशय मार्मिक भाषणें झालीं. त्याच वेळीं डॉ. के. ल. उर्फ भाऊजी दप्तरी; आचार्य विनोबा भावे आणि वीर वामनरावदादा जोशी यांचाहि सन्मान व्हावयाचा होता, पण ते संमेलनास न येऊं शकल्याने त्यांना शाल आणि श्रीफल पाठविण्यांत आलें. श्री. व. वा. शब्दे यांनी आभार मानल्यावर हा कार्यक्रम संपला.

खुलें अधिवेशन

यानंतर खुल्या अधिवेशनाला प्रारंभ झाला. अध्यक्षांनी ठराव मांडले व ते सर्व एकमताने मंजूर झाले. हे ठराव अन्यत्र देण्यांत आलेले आहेतच ठरावांनंतर श्री. बाबासाहेब खापर्डे यांनी

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

समारोपादाखल छोटेसें भाषण केलें. स्वागताध्यक्ष श्रीमान मनोहरभाई पटेल यांनी निमंत्रित सन्मान्य पाहुणे, प्रतिनिधि आणि संमेलनाचे सहाय्यकर्ते यांचे आभार मानतांना संमेलन यशस्वी करण्याबद्दल धन्यवाद दिले आणि विदर्भ साहित्य संघाच्या संकल्पित रंगमंदिराचें मध्यप्रदेशांतील महत्त्व विशद करून ह्या लोकसेवेच्या उपक्रमास सर्वांनी हातभार लावावा असे आपुलकीचे उद्गार काढले. तसेंच प्रतिनिधींतर्फे श्री. पु. य. देशपांडे यांनी संमेलन सफल करण्याची जबाबदारी अत्यंत उत्कृष्ट रीतीने पार पाडल्याबद्दल स्वागताध्यक्ष श्री. मनोहरभाई पटेल आणि स्वागत मंडळ आणि कार्यकर्ते यांचे आभार मानले. त्यानंतर कार्यकारी मंडळाच्या वतीने वि. सा. संघाचे उपाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे व म. प्र. संशोधन मंडळातर्फे म. म. वा. वि. मिराशी यांची हें संमेलन स्वागतमंडळ व तुमसरकर यांनी कमालीचें यशस्वी करून दाखविल्याबद्दल आभाराचीं भाषणें झालीं. स्त्री प्रतिनिधींच्या वतीने सौ. ताराबाई पाध्ये यांनी आभार मानले.

पुढील अधिवेशनाचें निमंत्रण

शेवटीं गोंदिया शाखेच्या वतीने शाखाध्यक्ष श्रीमान् छोटूसाभाई लहानुसाभाई क्षत्रीय यांनी पुढील १९ वें अधिवेशन, भवभूति-जन्मस्थानीं, आमगांव, जि. भंडारा (पद्मपूर) येथे भरविण्याविषयीं अत्यंत आग्रहाचें आमंत्रण दिलें.

वंदेमातरम्

स्थानिक विद्यार्थिनींनी वंदेमातरम् गायिल्यावर दोन दिवस चाललेलें हें संमेलन मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणांत उत्तमपणें पार पडलें.

यशाचे मानकरी

लक्ष्मीचा वरदहस्त असलेल्या ह्या तुमसरांतील सुप्रसिद्ध विद्यानगरींत सतत दोन आठवडे पूर्वतयारी करून, विद्युद्दीपांच्या माळांनी सजविलेल्या भव्य व निसर्गसन्निध संमेलनस्थानीं भरगच्च कार्यक्रमाच्या आणि अत्यंत सुग्रास पंचपक्वान्नांच्या धूमधडाक्यांत हें संमेलन कल्पनातीत यशस्वी झालें. या यशापाठीं स्वागताध्यक्ष श्रीमान् मनोहरभाई पटेल यांची कळकळीची देखरेख आणि उदार आश्रय हीं विनयाने अहोरात्र उभी होतीं. त्याचबरोबर कार्याध्यक्ष टिळक राष्ट्रीय शाळेचे थोर अध्वर्यु श्री. आ. म. माकडे गुरुजी यांनी रात्रंदिवस जातीने मार्गदर्शन करून सर्व व्यवस्था शिस्तशीर आखून दिली. स्वागतोपाध्यक्ष श्री. नारायणरावजी कारेमोरे आणि श्री. वासुदेवरावजी कोंडेवार यांनी संमेलनाच्या यशाचा फार मोठा वाटा उचलला. कोषाध्यक्ष श्री. मो. प. दामले गुरुजी यांना श्री. पु. य. देशपांडे यांच्या शब्दांत संमेलनाचा एकखांबी तंबू हें त्यांचें वर्णन अगदी योग्य आहे असें दिसून आलें. सरचिटणीस श्री. रा. र. सरदेशपांडे यांनीहि या सत्कार्यांतील आपला वाटा उचलतांना दाखविलेली तडफ आणि त्यांचे सहकारी श्री. तेलरांधे; श्री. मल्लेवार; श्री. उद्धवराव देशपांडे गुरुजी; श्री. कृ. ल. निर्वाण; प्रभृति शिक्षक वर्ग यांनी घेतलेले कष्ट या संमेलनाच्या यशाचे निस्संशय भागीदार आहेत; राष्ट्रीय शाळेंतील विद्यार्थी व स्वयंसेवक यांनी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

थंडीवाऱ्यांत पाहुण्यांच्या सोईसाठी रात्रंदिवस घेतलेली मेहनत कौतुकास्पद आहे. आणि तितकीच श्री. वसंत बाळाजी शब्दे, श्री. नानासाहेब तेलंग प्रभृति कार्यकर्त्यांची मदतहि मोलाची आहे. आकाशवाणीचे श्री. वा. रा. कान्त, श्री. श्रीवास्तव आणि श्री. मनोहर खोलकुटे यांनी संमेलनास उपस्थित राहून संमेलनाचे कार्यक्रम ध्वनिमुद्रित केले. त्यांचें व आकाशवाणीचें सहकार्य अभिनंदनीय आहे.

* *

शाखावृत्त

भंडारा शाखा

शाखेने सार्वजनिक वाचनालय व जिल्हा शासकीय वाचनालय यांच्या सहकार्याने दि. ११-१२-५९ रोजीं "श्री ज्ञानेश्वर पुण्यतिथि" डॉ. वा. ना. पंडित यांचे अध्यक्षतेखाली साजरी करण्यांत आली.

जिल्हाध्यक्ष श्री. आवळे यांनी अध्यक्ष डॉ. वा. ना. पंडित यांचा परिचय करून दिल्यावर अध्यक्षांनी ज्ञानेश्वरांच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करून अभिवादन केलें. त्यानंतर श्री. पांढरी-पांडे यांनी तयार केलेलें "श्री. ज्ञानेश्वरांवरील गीत" श्री. काटे यांनी गाऊन दाखविलें. डॉ. वा. ना. पंडित यांचें ज्ञानेश्वरीवर अत्यंत विद्वत्ताप्रचुर व बोधप्रद भाषण झालें. श्री. व. बा. शब्दे यांनी आभार मानल्यावर हा कार्यक्रम संपला.

* *

गोंडवण शाखा

दि. १६-१२-५९ रोजीं सायंकाळीं ५ वाजतां न्यू इंग्लिश स्कूलच्या सभागृहांत शाखा-कार्यकारिणीची सभा होऊन आचार्य शं. दा. जावडेकर यांच्या निधनाप्रीत्यर्थ दुखवट्याचा ठराव करण्यांत आला.

दि. १७-१२-५९ रोजीं रात्रौ ८-३० वाजतां मुंबईचे सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. अनंत काणेकर यांनी शाखेस भेट दिली त्यावेळीं त्यांचा सत्कार करण्यांत आला. प्रा. काणेकर यांचें "नवकाव्याचें प्रयोजन काय ?" यावर सुश्राव्य भाषण झालें.

* *

रामटेक येथे वि. सा. संघाची शाखा

विदर्भ साहित्य संघाच्या रामटेक येथील उत्साही कार्यकर्त्यांनी दि. ९-११-५९ रोजीं रामटेक शाखा स्थापन केली. त्यादिवशींच्या सर्वसाधारण सभेंत पुढील पदाधिकारी एकमताने निवडण्यांत आले.

अध्यक्ष—श्री. महादेवराव भास्करराव जोशी.

उपाध्यक्ष—श्री. नारायण शंकर फडणवीस.

कोषाध्यक्ष—श्री. दत्तात्रय त्रिंबक शास्त्री.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सरचिटणीस—श्री. कृष्णराव पांडुरंगपंत मैराळ.

चिटणीस—१ श्री. कृष्णराव आत्मारामपंत शेटे. २ श्री. नारायण दामोदर किंमतकार.

तसेंच कार्यक्रम समिति, नाट्यसमिति, परीक्षा विभाग इत्यादि समित्यांचीहि निवड करण्यांत आली.

दि. १०-११-५५ रोजीं सायंकाळीं ९ वा. श्रीराम विद्यालयाच्या दिवाणखान्यांत प्रा. पां. कृ. सावळापूरकर यांचे अध्यक्षतेखाली उद्घाटन समारंभ थाटाने साजरा झाला.

* *

खामगांव शाखा

विदर्भ साहित्य संघाच्या खामगांव शाखेतर्फे कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचें स्मारक म्हणून एक नाटयगृह बांधण्याच्या कल्पनेला जोराची चालना मिळाली असून निधि जमविण्याचा एक मार्ग म्हणून शाखेने नाट्य प्रयोगांचा उपक्रम सुरू केला आहे. आचार्य अत्रेकृत 'प्राणिग्रहण' नाटकाचे ओळीने तीन प्रयोग खामगांव, बुलढाणा व अकोला येथे नुकतेच करण्यांत आले. पैकीं पहिल्या प्रयोगाचे खर्च वजा जातां संपूर्ण उत्पन्न रु. १००० कोल्हटकर-स्मारक-निधींत जमा करण्यांत आलें. बुलढाणा येथील प्रयोगाच्या उत्पन्नाचा कांही भाग स्थानिक गर्दे वाचनालयाला देण्यांत आला. अकोला येथील उत्पन्नाचा खर्च वजा जातां अर्धा हिस्सा कोल्हटकर-स्मारक निधीला मिळाला व अर्धा हिस्सा अकोला येथील होमिओपॅथिक कॉलेजला देण्यांत आला.

तिन्ही ठिकाणचे प्रयोग उत्कृष्ट झाले. अकोला येथील प्रयोग तर फारच रंगल्यामुळे पुन: प्रयोगाची मागणी आहे.

खामगांव शाखेतर्फेच 'बेबंदशाही' नाटकाचा प्रयोग प्रजासत्ताक सप्ताहांत व्हावयाचा आहे.

वि. सा. संघाच्या खामगांव शाखेतर्फे बुलढाणा जिल्हा साहित्य संमेलन फेब्रुवारीच्या १०-११ तारखेस व्हावयाचें असून प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे या संमेलनाचें अध्यक्षस्थान स्वीकारणार आहेत. या संमेलनांतच एका युवक साहित्य संमेलनाचें आयोजन करण्यांत आलें असून त्याचें अध्यक्षपद श्री. द. रा. गोमकाळे स्वीकारणार आहेत.

* *

गोंदिया शाखा

संक्रमणोत्सव

येथील वि. सा. संघ शाखा व 'मित्रमंडळ' संस्था यांच्या विद्यमाने संक्रांतीचा तिळगुळ समारंभ ता. १५-१-५६ रोजीं येथील श्री. सरस्वती महिला विद्यालयाचे इमारतींत साजरा करण्यांत आला. त्या प्रसंगीं प्रमुख वक्ते म्हणून येथील प्रसिद्ध ॲडव्होकेट श्री. वी. अं. लिमये यांचें पाश्चात्य संस्कृति व भारतीय संस्कृति या विषयावर समयोचित भाषण झालें. अध्यक्षस्थानीं

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शाखेचे उपाध्यक्ष श्री. कुळकर्णी वकील होते. समारंभाचा आरंभ श्री. वसंतराव मातुरकर यांच्या संक्रमण गीताने झाला व समारोप श्री. देव यांनी केला. तिळगुळ वितरण होऊन कार्यक्रम संपला.

संघाला जागा मिळाली

या महिन्यांतील सर्वांत महत्त्वाची व प्रमुख घटना म्हणजे येथील शाखेला भवभूति स्मारक इमारतीकरितां ता. २१-१-५६ रोजीं मिळालेलें जागेचें दान ही होय. ही जागा येथील प्रसिद्ध व्यापारी श्री. मनोहरभाई पटेल यांच्या धर्मपत्नि सौ. दाईबहेन पटेल यांच्या मालकीची होती. ती त्यांनी श्री. मनोहरभाई यांच्या प्रेरणेने रजिस्टर्ड दानपत्राने दिली. जागा येथील टिळकवार्ड (रेल्टोली) भागांत असून चांगली प्रशस्त (४०० फूट लांब व ९० फूट रुंद) आहे. वरील जागा दान देऊन श्री. मनोहरभाई पटेल व त्यांच्या धर्मपत्नि सौ. दाईबहेन यांनी येथील शाखेच्या मार्गातील फारच मोठी अडचण दूर केली आहे व त्याबद्दल शाखा त्यांची फार आभारी आहे.

वरील जागेची दानपत्राप्रमाणे किंमत ४५०० रु. आहे. जागेचा दानविधि झाल्यानंतर ता. २२-१-५६ रोजीं शाखेच्या कार्यकारिणीची तातडीची सभा होऊन त्यांत श्री. मनोहरभाई व त्यांच्या धर्मपत्नि सौ. दाईबेन यांचें अभिनंदन करणारा ठराव एकमताने पास करण्यांत आला. जागेचे दान वि. सा. संघ शाखेला मिळवून देण्याचें बरेचसें श्रेय श्री. नानासाहेब तेलंग वकील यांना आहे.

जागेचा प्रश्न अशा रीतीने सुटल्यामुळे वि. सा. संघ शाखेवर विदर्भ कवि भवभूति याचें योग्य स्मारक करण्याबद्दल जबाबदारी येऊन पडली आहे व लवकरच त्या दृष्टीने शाखेचा प्रयत्न सुरू होईल व शाखेच्या प्रयत्नांना यश येईल अशी आशा आहे.

श्री. माधवजी दप्तरी स्मृति
संदर्भ ग्रंथालय
विदर्भ साहित्य संघ, नागपूर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचे उद्देश आणि गरजा

१. विदर्भ साहित्य मंदिराची इमारत पूर्ण करणें व नाट्यगृह बांधणें.

२. वि सा. संघाच्या परीक्षांना व्यापक आणि सर्वोपयोगी स्वरूप देणें.

३. वि. सा. सं. चें मुखपत्र युगवाणी आर्थिक दृष्टीने स्वावलंबी करून उत्तरोत्तर त्याचें स्वरूप सर्वांगीण करणें.

४. वि. सा. सं. च्या वतीने दुर्मिळ ऐतिहासिक, शैक्षणिक व वाङ्मयीन ग्रंथांचें प्रकाशन

५. मराठी भाषेच्या हिताचें प्रातिनिधिक स्वरूपाचें कार्य करणें.

मराठी-प्रेमी जनतेने तनमनधनाने विदर्भ साहित्य संघाला मदत करावी अशी नम्र विनंती आहे.

'युगवाणी' सदस्यांना बिनामूल्य. ✳ सभासदत्वाचें वार्षिक शुल्क फक्त तीन रुपये

हें मासिक श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे यांनी वि. सा. संघाकरितां नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर १ येथे मुद्रित करून संघ-कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, सीताबर्डी, नागपूर १ येथे प्रकाशित केलें.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ